दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१९९ रविवार दि.२९ मार्च २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-199 Sunday, Dt.29 March 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


# वाळू उत्खननासाठी कडक नियम लागू करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आदेश

### यापुढे वाळू डेपो किंवा साठवण ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक, वाळू उत्खनन यांत्रिक साधनांनी नव्हे तर केवळ मानवी श्रमांच्या साहाय्यानेच करावे लागणार..!



माजलगाव (प्रतिनिधी)

उत्खनन व वाहतूक प्रक्रियेत पारदर्शकता व कायदेशीर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार वाळू उत्खनन, साठवण व वाहतूक करताना सर्व संबंधितांनी निश्चित केलेले नियम काटेकोरपणे पाळणे बंधनकारक राहणार आहे.

प्राप्त माहितीनुसार, वाळू उत्खनन करताना कोणत्याही प्रकारे यांत्रिक साधनांचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. केवळ मानवी श्रमांच्या साहाय्यानेच उत्खनन करावे लागणार आहे. तसेच उत्खननाची नोंद नियमितपणे ठेवणे आवश्यक असून संबंधित ठिकाणी अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाणार आहे.

वाळूची वाहतूक करताना वैध परवाना व आवश्यक कागदपत्रे सोबत असणे बंधनकारक आहे. वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व वाहनांमध्ये जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक करण्यात आले आहे. तसेच ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतूक करावी लागणार असून नियमभंग केल्यास कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. (पान २ वर...)

## परळी बसस्थानक परिसरात सापडलेल्या दीड वर्षांच्या मुलीबाबत पोलीसांची शोध मोहीम सुरू

परळी (प्रतिनिधी)

बसस्थानक परिसरात एका दीड वर्षांच्या मुलीला तिच्या आई-वडिलांनी किंवा पालकांनी उघड्यावर सोडून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, *दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी* सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास परळी बसस्थानक परिसरात संबंधित मुलगी आढळून आली. याबाबत सालोमन मायकल कसबेकर (वय ५२, व्यवसाय - नोकरी, अधीक्षक आशा शिशुगृह, परभणी, रा. चिद्रावर नगर, जुना पेंढगाव रोड, परभणी) यांनी *दिनांक २६ मार्च २०२६ रोजी संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.*

या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ९३ अन्वये गुन्हा दाखल केला



असून, या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक ए. टी. शिंदे हे करीत आहेत.दरम्यान, तपासादरम्यान संबंधित मुलीचे आई-वडील किंवा पालकांचा शोध घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. जर कोणाला या मुलीबाबत किंवा

(पान २ वर...)

## मातृत्वाच्या भावनेतून मी तुमची सेवक म्हणून काम करतेय ; सर्व सामान्य, गोरगरीबांची कामे करताना कायम पाठिशी राहील

### ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अंबाजोगाईत जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उदघाटन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बीड हा माझा जिल्हा आहे. या जिल्ह्यावर माझे विशेष प्रेम आहे. 'आईची माया दाईला येत नसते' या पद्धतीने या जिल्ह्याच्या विकासासाठी आपली सदैव तळमळ राहिली आहे आणि राहणार आहे. मी तुमची सेवक म्हणून काम करणार आहे, यात मातृत्वाची भावना देखील आहे. मंत्री असताना मी यापूर्वीही अंबाजोगाईत जनतेच्या कामांसाठी कार्यालय सुरू केले होते.त्याच प्रथेला अनुसरून आज अंबाजोगाई येथे संपर्क कार्यालय सुरू केले आहे. हे कार्यालय सर्वसामान्य जनतेला विनासायास व विनाकष्ट जिथल्या तिथे त्यांची कामे होण्यासाठी कार्यरत राहील अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली.

शहरातील प्रशांत नगर येथे सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे



उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले त्यावेळी जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांसमोर त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार ,युवा नेते अक्षय मुंदडा, बालासाहेब दोडतले, संतोष हंगे, सलीम जहांगीर, आदित्य सारडा, युद्धजित पंडित, माधव निर्मळ, गणेश कराड आदींसह भाजपाचे जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी,मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रत्येकाची कामे व्हावी यासाठी हे कार्यालय

यावेळी बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,जनतेची सर्व कामे जिथल्या तिथे पार पाडावी यासाठी एक सुसज्ज अशी यंत्रणा या माध्यमातून उभी करण्याचा आपला प्रयत्न आहे. मला भेटण्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या

(पान २ वर...)

## तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत महिलेची आत्महत्या



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरात आज दि.२८ मार्च शनिवार रोजी सकाळी धक्कादायक घटना घडली शहरातील पठाण मांडवा रस्त्या लगतच्या परिसरात एका अज्ञात

(पान २ वर...)

## दरोडयाच्या गुन्हयातील ३५ वर्षापासुन फरार आरोपी अखेर जेरबंद




बीड (प्रतिनिधी)

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्हयात दि.२१/०३/२०२६ ते ३१/०३/२०२६ पर्यंत जिल्हयातील फरार आरोपी शोध मोहीम राबवुन विविध गुन्हयात फरार/पहीजे आरोपींताचा शोध घेवुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेशीत केले होते. यावरुन पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी सर्व पथक प्रमुख यांना वर नमुद आदेश देवुन कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार ३५ वर्षापासून फरार आरोपी

(पान २ वर...)

## जिल्हाधिकारी साहेब, अवकाळी पावसाने वाहून गेलेल्या पुलांची दुरुस्ती कधी ?

### तत्कालीन पालकमंत्री अजितदादांनी मंजूर केलेल्या निधीचं काय झालं - डॉ. गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील अनेक रस्ते, नळकांडी पुल, तलाव व बंधारे वाहून गेले होते. त्यावेळी तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने दुरुस्तीचे आदेश देत आपत्ती व्यवस्थापनांतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला होता. मात्र, या घटनेला सहा महिने उलटूनही अनेक ठिकाणी दुरुस्तीची कामे रखडलेली आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून नागरिकांना मोठा



त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मंजूर निधीचा उपयोग नेमका कधी होणार? आणि प्रत्यक्ष कामांना सुरुवात कधी होणार? असा सवाल उपस्थित केला आहे.

लिंबागणेश-बोरखेड रस्ता अद्यापही खचलेलाच

बीड तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड हा महत्त्वाचा रस्ता व पुल सप्टेंबरमधील पावसात वाहून गेला होता. या रस्त्यावरून वाणी वस्ती, घोलप वस्ती, गावडे वस्ती, ढवळे वस्ती, घरत वस्ती,

(पान २ वर...)

## धर्माबाद रेल्वे स्टेशन नांदेड डिव्हिजन मध्ये समाविष्ट करा व प्रलंबित मागण्यांची दखल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी घेतली

### मराठवाडा जनहित पार्टीच्या पाठपुराव्याला यश - उपनगराध्यक्ष शंकर बोल्लमवाड

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद रेल्वे स्टेशन नांदेड डिव्हिजन मध्ये समाविष्ट करा यासह प्रलंबित मागण्यांची दखल खासदार अशोकराव चव्हाण यांनी घेतली. त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्याकडे लेखी पाठपुरावा केला होता. या मागणीची दखल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी घेतली असून सदरील मागणी पूर्ण करण्यासाठी रेल्वे प्रशासनाला आदेशीत केले आहे.शहरातील रेल्वे गेट क्रमांक १७८ व रेल्वे गेट क्रमांक १७९ येथे फूटवे ब्रिज बांधकाम करण्यासाठी जागेची पाहणी करण्यासाठी लवकरच रेल्वे प्रशासनाचे एक पथक धर्माबाद




येथे दाखल होणार असल्याचे मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष शंकर बोल्लमवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

येथील रेल्वेच्या प्रलंबित मागण्यांकडे रेल्वे प्रशासनाने दुर्लक्ष करीत असल्यामुळे तालुक्यातील जनतेला अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे. शहरातील रेल्वे गेट क्रमांक १७८ व रेल्वे गेट क्रमांक १७९ हे दिवसातून ३० ते ४० वेळा बंद व चालू होत असल्यामुळे धर्माबाद तालुक्यातील जनतेला अनेक संकटांचा सामना करावा लागत

(पान २ वर...)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय....

# हा तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा संघर्ष

महाराष्ट्र एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. एका बाजूला शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विवेकवादी, समताधिष्ठित विचार; तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा, भोंदूपणा आणि सामाजिक अध:पतन. हा संघर्ष केवळ विचारांचा नाही, तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आहे.

महाराष्ट्र एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. एका बाजूला शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विवेकवादी, समताधिष्ठित विचार; तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा, भोंदूपणा आणि सामाजिक अध:पतन. हा संघर्ष केवळ विचारांचा नाही, तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आहे.अभंगातून संत तुकारामांनी विचारलेला जळजळीत सवाल आजच्या महाराष्ट्राच्या वास्तवाला थेट भिडणारा आहे. वैराग्याचे सोंग घेत, दैवी शक्तींचा आव आणणारे तथाकथित 'साधू' प्रत्यक्षात स्वार्थ, पाखंडीपणा आणि अनाचाराचे केंद्र बनत आहेत, हे कटू वास्तव वारंवार समोर येत आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या मूल्यांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांनी घडवलेल्या सामाजिक न्याय आणि प्रबोधनाच्या परंपरेपर्यंत विवेक, समता आणि तर्कशुद्धतेचा वारसा लाभलेल्या या पुरोगामी महाराष्ट्रात वाढलेले भोंदूबाबांचे जाळे ही सामाजिक अधोगतीची नांदी आहे.

नाशिकचा भोंदूबाबा कॅप्टन अशोक थोरात प्रकरणाने या संकटाचे भयावह स्वरूप उघड केले. महिलांचे लैंगिक शोषण, अत्याचार, ब्लॅकमेलिंग आणि आर्थिक लूट यांसारख्या आरोपांनी संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले. मात्र, या घटनेचे गांभीर्य केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपुरते मर्यादित नाही; ते एका व्यापक आणि चिंताजनक वास्तवाकडे बोट दाखवते. अशा भोंदूबाबांना मिळणारा सामाजिक स्वीकार, त्यांना लाभणारा राजकीय आश्रय आणि सामान्य माणसाच्या असुरक्षिततेचा घेतला जाणारा गैरफायदा, या सर्वांच्या संगनमताने उभा राहिलेला हा विकृत प्रकार आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ अंधश्रद्धेपुरता मर्यादित राहत नाही; तो समाजाच्या विवेकबुद्धी, नैतिकता आणि संस्थात्मक जबाबदारीची मूलभूत कसोटी ठरतो.

अंधश्रद्धा आणि विवेकाचा संघर्ष

महाराष्ट्रातील थोर साधू-संतांनी समाजप्रबोधन करताना अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केले. महाराष्ट्राने देशाला अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा दिला. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा उभारला आणि त्यासाठी प्राणांची आहुती दिली. बदलत्या काळात अंधश्रद्धा गावखेड्यातील जादूटोण्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. आधुनिक रूप धारण करून तिने समाजात शिरकाव केला आहे. चमत्कारिक उपचार, दैवी शक्ती, आध्यात्मिक मार्गदर्शन अशा आकर्षक शब्दांच्या आडून नव्या पिढीपर्यंतही तिचा प्रभाव पोहोचत आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सॲप, यूट्यूब यांसारख्या माध्यमांनी या भोंदूपणाला एक प्रकारची वैधता आणि व्यापकता दिली आहे. या अंधश्रद्धेचा सर्वात भीषण पैलू म्हणजे, ती केवळ आर्थिक फसवणुकीपुरती मर्यादित राहत नाही, तर मानवी प्रतिष्ठेवरही घाला घालते. विशेषतः माता-भगिनींचे शोषण, लैंगिक अत्याचार, मानसिक गुलामी यांसारख्या घटना वारंवार समोर येत आहेत. सामाजिक-आर्थिक अस्थिरता, आरोग्य समस्या, कौटुंबिक ताण, यांमुळे माणूस मानसिकदृष्ट्या असहाय्य होतो आणि अशा वेळी सर्व समस्यांवर सोपा उपाय देण्याचा दावा करणारा भोंदूबाबा त्याला सहज आकर्षित करतो. विज्ञान आणि तर्क यांच्याऐवजी अंधविश्वासावर आधारित उपाय अधिक सहज, जलद आणि 'आश्वासक' वाटू लागतात. याचा गैरफायदा अशोक खरातसारखे भोंदूबाबा घेतात. हे समाजासाठी अत्यंत धोकादायक आहे. म्हणूनच, अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा केवळ कायद्यापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही. तो शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जागृती यांच्या माध्यमातून अधिक व्यापक पातळीवर लढला पाहिजे.

# जागर महामानवांच्या विचारांचा, संयुक्त जयंतीनिमित्त व्याख्याते धर्मराज करपे यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न




माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने रयतेचे राजा छत्रपती शिवाजी महाराज, संतश्रेष्ठ संत रविदास, संत सेवालाल महाराज, लोकशिक्षणाचे पुरस्कर्ते संत गाडगेबाबा, त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर (माता रमाई) व प्रेरणामूर्ती भीमाबाई रामजी आंबेडकर (माता भिमाई) यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त जागर महामानवांच्या विचारांचा या विषयावर व्यंकटेश हॉल या ठिकाणी व्याख्याते धर्मराज करपे यांचे सविस्तर व्याख्यान उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर प्रास्ताविकात भरतभाऊ टाकणखार यांनी कार्यक्रमा मागील उद्दिष्ट स्पष्ट केले. महापुरुषांच्या जयंती केवळ औपचारिकरित्या साजरी न करता त्यांच्या विचारांचे समाज मनात रोपण व्हावे आणि कर्मचारी व सर्वसामान्य जनतेमध्ये सामाजिक जाणीव दृढ व्हावी, हा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते धर्मराज करपे यांनी रयतेचे राज्य, संतांची समता आणि मातृत्वाचा त्याग हाच आपल्या समाज परिवर्तनाचा मार्ग असून त्याचा अवलंब केल्यानंतरच मानवी जीवन सुकर बनू शकते असे प्रतिपादित केले. व्याख्यात्यांनी आपल्या ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुशासन, स्वाभिमान व लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श मांडला. संत रविदासांनी दिलेला समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. संत सेवालाल महाराजांनी समाजसंघटन, नैतिकता आणि परंपरांचे जतन यासाठी केलेले कार्य विशेषत्वाने सांगितले.संत गाडगेबाबांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान आणि शिक्षण प्रसारासाठी केलेल्या अथक परिश्रमांचा उल्लेख करताना, समाजपरिवर्तनासाठी कृतीप्रधान विचारांची गरज अधोरेखित करण्यात आली. माता रमाई आणि माता भिमाई यांच्या त्याग, संघर्ष आणि संस्कारांनी घडवलेली सामाजिक चेतना ही प्रत्येक कुटुंबासाठी आदर्श असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित बद्रीनाथ करपे, अशोक लांडगे, सखाराम जोशी, वरूनराज तौर, अमर साळवे, आनंद सिरसट, नामदेव पाचपुते, नामदेव कोकाटे, प्रभाकर साळवे, बाळासाहेब सोनसळे, अशोक राठोड, साहेबराव राठोड, प्रा. संजय बागुल, भगवान डोंगरे, विकास टाकणखार, दीपकतात्या टाकणखार, रवींद्र टाकणखार, विजयकुमार कटारे, लक्ष्मण मस्के, गोविंद गोचडे, सुदर्शन स्वामी, पांडुरंग जाधव, बन्सी डोंगरे, नितीन डोंगरे, विश्वनाथ शिंदे, शेषराव भागवत, बाळासाहेब मोरे, प्रवीण काळे, मोहन राठोड, नितीन काळे, साहेबराव चव्हाण, अमोल राऊत, बाबा लोखंडे, माणिक राठोड, लक्ष्मण सरवदे, उत्तम पवार, बबन गुहाडे, संतोष साबळे, तय्यब शेख, अबूबकर सिद्दिकी, गेनू पवार, पी. बी. शिंदे, सुरेश सोळंके, सुमंत राऊत, श्यामसुंदर दासरे, नरसिंग भांजे, प्रभाकर पांचाळ, चंद्रकांत गायकवाड, बालाप्रसाद चव्हाण, भगवान सातपुते, राजाभाऊ आबूज, अविनाश राठोड, शशिकांत घनघाव, सिद्धार्थ ढवळे, बाजीराव काळे आदी मान्यवरांनीही महापुरुषांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी कार्यक्रमास समाजघटकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सभागृहात उत्साह, प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकीचे वातावरण निर्माण झाले होते.कार्यक्रमाचे बहरदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले. तर कार्यक्रमाची अध्यक्षता राहल टाकणखार यांनी व आभार अभिमन्यू ईबीते मानले. शेवटी सर्व उपस्थितांनी सामाजिक समता, बंधुता, स्वाभिमान व संविधानिक मूल्यांची जोपासना करण्याचा सामूहिक संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमासाठी वसंत टाकणखार, प्रवीण जाधव, राजेंद्र सातपुते, गोविंद पवार, राजकुमार सोनवणे, कृष्णा हौसरमल, नितीन पुटवाड, जीवन डोंगरे, अमोल राऊत, राहुल खुणे, अतुल चाळक, शेख जमीर आदींनी परिश्रम घेतले.



माजलगाव (प्रतिनिधी)

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, सिमरी पारगाव यांच्या वतीने शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. सकाळी ७ वाजता पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या थाटामाटात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या ध्वजांच्या साक्षीने निघालेल्या या पालखी सोहळ्याने संपूर्ण गाव शिवमय झाले होते.

पालखी सोहळ्यानंतर सकाळी ९ वाजता भाग्यश्रीताई मोहिते पाटील यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत तरुणांना राष्ट्रसेवा, चारित्र्य आणि स्वाभिमानाचे महत्त्व पटवून दिले. उपस्थित नागरिकांनी व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

---

**जाहीर प्रगटन पेपर**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४९५/२०२६**

सीएनआर क्रमांक MHBI0200009542026

**शेख शाहेदा शेख इसुफ व ईतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. एस. एस. महाजन)**

**अर्जदार :-**

१. शेख शाहेदा भ्र. शेख इसुफ, वय ६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. शहेंशावली दर्गा रोड, इस्लामपुरा, बीड ता. जि. बीड

२. शेख शबाना भ्र. कौसर, वय-४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. शहेंशावली दर्गा रोड, इस्लामपुरा, बीड ता. जि. बीड

**विरुध्द निरंक**

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. १ व २ यांनी या न्यायालयात शेख युसुफ पि. शेख हुसेन यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.ज्याअर्थी मयत शेख युसुफ पि. शेख हुसेन यांचा मृत्यु दिनांक १५/०४/२०२४ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत शेख युसुफ पि. शेख हुसेन यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ३०/०४/२०२६

आज दिनांक २५ माहे मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**सह दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**

---

# अंबाजोगाईत चिमुरडीचा धक्कादायक मृत्यू

# अत्याचाराचा पर्दाफाश

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची कडक भूमिका

मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात घडलेल्या २ वर्षे ५ महिने वयाच्या चिमुरडीवरील अत्याचार व मृत्यूची घटना अत्यंत संतापजनक असल्याचे सांगत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रशासनाला तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.

प्राथमिक तपासात मृत्यू अपघाती असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र शवविच्छेदन अहवालातून लैंगिक अत्याचार स्पष्ट झाल्याने प्रकरण गंभीर झाले असून, हा अहवाल महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले असून गुन्ह्याची नोंद भारतीय न्याय संहिता २०२३ व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (झजउडज) कायद्यानुसार करण्यात आली आहे.

घटनेची गांभीर्याने दखल घेत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या प्रकरणाचा तपास जलदगती न्यायालयात चालवून आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच तपास पारदर्शक ठेवून सर्व वैद्यकीय व भौतिक पुरावे भक्कमपणे सादर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर कायद्यानुसार बाल सुधारगृहात ठेवण्याची प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी, असे त्यांनी नमूद केले.पीडित कुटुंबाला समुपदेशन व सुरक्षा देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बालसुरक्षा व जनजागृती मोहिमा राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

---

पान १ वरुन...

**मातृत्वाच्या भावनेतून...**

लोकांचा मोठा जनसमुदाय असतो. यामध्ये सामान्य माणसाला भेटताना एकाच वेळी गर्दी झाल्याने धावपळ होते व कामेही नीट करता येत नाहीत. याला कुठेतरी शिस्त लागली पाहिजे व कामांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. या दृष्टीकनातून आपण संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून एक सशक्त व सर्व उपयोगी अशी यंत्रणा उभी करत आहोत. या अनुषंगाने अंबाजोगाई येथील हे संपर्क कार्यालय जनतेची छोटी-मोठी सर्व कामे या ठिकाणावरून करणार आहे.लवकरच बीड येथेही अशाच पद्धतीचे संपर्क कार्यालय व जनतेच्या कामांसाठीची यंत्रणा आपण उभी करणार आहोत. त्याचप्रमाणे अन्य तालुक्यांच्या ठिकाणीही संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून अशी यंत्रणा उभी करण्याचा आपला मनोदय आहे.

मी तुमची सेवक

आपण सदा सर्वकाळ जनतेसाठी उपलब्ध असतो. परंतु विरोधकांनी कधीकाळी याच गोष्टीचा मुद्दा बनवत माझ्यावर टिका केली, नावे ठेवली आहेत. मात्र सर्वांना माहीत आहे की आपण सदैव जनतेच्या कामांसाठी उपलब्ध असतो. मुंबई असो किंवा महाराष्ट्रभरात सर्वत्र फिरत असताना प्रत्येक ठिकाणी आपण जनता दरबार व जनतेची कामे करण्यातच व्यस्त असतो. यासाठीच माझे जीवन आहे. माझ्या जीवनात देवधर्म आणि जनता पूजा याशिवाय दुसरे काहीही नाही. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या विचारावर वाटचाल करत असताना त्यांच्याच पद्धतीने काम करण्याचा सदैव आपण प्रयत्न केला आहे. मुंबई असो किंवा इतरत्र आपण देवपूजा झाल्यानंतर पहिल्यांदा लोकांच्या भेटीगाठी घेतो त्यानंतरच अन्न सेवन करतो. भेटणाऱ्यांचा लोंढा भरपूर असल्याने यामध्ये प्रत्येकाची व्यवस्थित भेट होणे.प्रत्येकाचा प्रश्न.प्रत्येकाची समस्या नीट समजावून घेणे आवश्यक ठरते. यासाठी विशिष्ट शिस्तबद्ध यंत्रणा आपण राबवत आहोत आणि गेल्या काही दिवसात ही शिस्त व याचा चांगला परिणामही दिसून येत आहे. जनतेची कामे होणे हे शेवटी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठीच ही कार्यालये कार्यरत राहतील अशी ग्वाही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी दिली.

बीड जिल्ह्यात शत प्रतिशत आपली सत्ता... हेच आपले स्वप्न

यावेळी बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की.लोकसभेला आपला झालेला पराभव जनतेच्या मनाला लागलेला आहे. या पराभवाने खचून जाऊन आपल्या काही बांधवांनी स्वतःचे जीवही गमावले आहेत. एवढे निसिम व निरपेक्ष प्रेम जनतेने आपल्या नेतृत्वावर केलेले आहे. त्यामुळे हे नेतृत्व जनतेसाठीच समर्पित असून बीड जिल्ह्यात आपला खासदार आणि सहाच्या सहा आमदार आपलेच होते. हेच यश पुन्हा एकदा आपल्याला निर्माण करून दाखवावे लागेल.. बीड जिल्ह्यात आपल्याला शतप्रतिशत यश मिळवायचे आहे. हे आपले स्वप्न आह. एखादे स्वप्न आपण बघतो आणि ते पूर्ण होत नाही असे होणार नाही. कारण आपण जी स्वप्न बघितली ती सर्वसामान्य जनता आणि या बीड जिल्ह्यासाठी बघितलेली आहेत.ही स्वप्न पूर्ण करण्यासाठी जनता जनार्दन आणि ईश्वर निश्चितच आशीर्वाद देणार असल्याची आपल्याला खात्री आहे. बीड जिल्ह्यात येणाऱ्या काळात शतप्रतिशत आपला विजय व्हावा यासाठी ठिकठिकाणी निर्माण होणारी आपली संपर्क कार्यालय मोठं योगदान देतील असा आपल्याला विश्वास आहे. त्या दृष्टिकोनातून सशक्त व सुसज्ज अशी या कार्यालयाची यंत्रणा आपण करत आहोत.संपूर्ण बीड जिल्ह्यात आपलीच सत्ता येण्यासाठी सर्वांनी कामाला लागले पाहिजे असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

**जिल्हाधिकारी साहेब,....**

मुळे वस्ती येथील नागरिकांचा दैनंदिन संपर्क आहे. भाजीपाला, दुग्ध व्यवसाय तसेच विद्यार्थ्यांच्या ये-जा यावर याचा मोठा परिणाम होत आहे.

दि.३० सप्टेंबर रोजी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची

पान १ वरुन...

दखल घेत पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा वार्षिक योजना (लेखाशिर्ष ३०५४-३१२१ - ग्रामीण रस्ते विकास योजना) अंतर्गत सन २०२५-२६ साठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता.

कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्र.१, जिल्हा परिषद बीड यांनी निविदा प्रक्रिया सुरू असल्याचे लेखी कळवले होते. मात्र, आजतागायत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

दरम्यान, रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच खराब होत असून आगामी पावसाळ्यापूर्वी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अन्यथा नागरिकांना पुन्हा मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

**धर्माबाद रेल्वे स्टेशन....**

असल्यामुळे सदरील रेल्वे गेट क्रमांक १७८ व रेल्वे गेट क्रमांक १७९ येथे हिंगोलीच्या धर्तीवर फूटवे ब्रिज करण्याची मागणी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडे मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष शंकर बोल्लमवाड, बाजार समितीचे माजी उपसभापती मोईजोद्दीन करखेलीकर व गटनेता ताहेर पठाण यांनी लेखी निवेदनाद्वारे केले होते. या मागणीला अखेर न्याय मिळाला आहे.

मराठवाडा जनहित पार्टीचे नगरपरिषदेच्या निवडणुकीत १५ नगरसेवक व थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत सौ. संगिताताई शंकर बोल्लमवाड यांना विक्रमी मतांनी शहरातील जनतेनी निवडूण दिले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. संगिताताई बोल्लमवाड यांनी पहील्याच सर्वसाधारण सभेत नियोजन व विकास सभापती कृष्णा तिम्मापुरे यांनी सुचविलेले रेल्वे संदर्भातचे विषय विषयपत्रिकेत घेतले आहे. सदरील विषयास सभागृहात एकमतानी ठराव मंजूर करण्यात आला आहे. धर्माबाद नगरपरिषदेच्या इतिहासात आजपर्यंत रेल्वेच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात विषय ठेवण्यात आले नव्हते. परंतु शहरातील रेल्वे गेट क्रमांक १७८ व रेल्वे गेट क्रमांक १७९ येथे फूटवे ब्रिज बांधकाम करण्यासाठी तसेच धर्माबाद रेल्वे स्थानकावर जलद रेल्वे एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावे, यासाठी एकमताने ठराव मंजूर करण्यात आला आहे. सदरील ठरावाची सत्यपत्र जोडून मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष शंकर बोल्लमवाड, बाजार समितीचे माजी उपसभापती मोईजोद्दीन करखेलीकर, गटनेता ताहेर पठाण यांनी खासदार अशोकराव चव्हाण व खासदार डॉ.अजित गोपछडे यांची दिल्ली येथे भेट घेऊन रेल्वेच्या प्रलंबित मागण्याचा पाढा वाचला आहे. सदरील मागणीची दखल खासदार अशोकराव चव्हाण यांनी घेतली असून धर्माबाद रेल्वेच्या प्रलंबित मागण्या तात्काळ पूर्ण करण्यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्याकडे लेखी पत्र पाठविले होते. खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मागणीची दखल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी घेतली असून त्यांनी लगेच धर्माबाद शहरातील रेल्वे गेट क्रमांक १७८ व रेल्वे गेट क्रमांक १७९ येथे फूटवे ब्रिज बांधकाम करण्याचे लेखी सुचना रेल्वे प्रशासनाला दिल्यामुळे धर्माबाद तालुक्यातील जनतेतत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरील मागणी पूर्ण होत असल्याचे चित्र दिसत आहेत. तसेच रेल्वे प्रशासनानी सदरील मागणीची दखल घेतली आहे. व येत्या काही दिवसांतच डिआर एम सिकंदराबाद येथील रेल्वेचा एक पथक धर्माबाद शहरात येणार असल्याचे खात्रीलायक वृत्त असल्याचे मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष शंकर बोल्लमवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे. तसेच धर्माबाद रेल्वे स्थानकावर जलद रेल्वे एक्स्प्रेस गाड्यांना थांबा मिळावा, यासाठी खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्याकडे पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे बोल्लमवाड यांनी सांगितले आहे. यावेळी पत्रकार परिषदेत गटनेता ताहेर पठाण, नियोजन व विकास सभापती कृष्णा तिम्मापुरे, बांधकाम सभापती समीर भाई,महीला व बालकल्याण सभापती सौ.सुरकूटवार , नगरसेविका सुलताना बेगम उपस्थित होते.

पान १ वरुन...

**तिसऱ्या मजल्यावरून ....**

महिलेने तिसऱ्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेत संबंधित महिलेचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास ही घटना घडली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, मृत महिलेची ओळख पटली असून वैशाली सुनिल चिकटकर असं सदरिल महिलेचे नाव आहे. मूळच्या जवळगाव येथील रहिवासी असलेल्या वैशाली मुलांच्या शिक्षणासाठी अंबाजोगाईत भाड्याने रहात होत्या. त्यांनी आत्महत्या का केली ? याचे कारणही अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस विविध अंगांनी तपास करत आहेत. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात असून, अधिक तपास अंबाजोगाई शहर पोलीस करत आहेत.

**परळी बसस्थानक परिसरात ....**

तिच्या पालकांबाबत कोणतीही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**दरोडयाच्या गुन्हयातील ३५....**

भागवत कमसऱ्या पवार रा. कोरेगाव ता. केज यास पोउपनि विघ्ने यांनी गोपनिय माहीतीतून सदर आरोपी हा खुप दिवसानंतर त्याचे राहते घरी आला आहे. यावरुन स्था.गु.शा पथकाने सापळा लावुन आरोपीस ताब्यात घेत धाडसी कारवाई केली आहे.

दि.२७/०३/२०२६ रोजी पो. उपनि महेश विघ्ने हे त्यांचे पथकासह पाहीजे फरार आरोपीतांचा शोध घेणे कामी केज उपविभागात रवाना झाले होते. पोलीस स्टेशन केज येथील गु.र.नं २३१/१९९१ कलम ३९५ भा.द.वि गुन्हयातील सदर आरोपी हा पो.स्टे केज गु.र.नं २६८/२०१८ कलम १४३,१४७,१४९ भा.द.वि गुन्हयात देखील पाहीजे होता. सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्यास पुढील कारवाई कामी पो.स्टे. केज यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, पोह महेश जोगदंड, पोह/दिलीप गित्ते, चापोह गणेश मराडे यांनी केली आहे.

**वाळू उत्खननासाठी ...**

पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहेत. पर्यावरण परवानगी (एर्पीेंळीपाशपीं उश्रशरीरपलश) घेतल्याशिवाय कोणतेही उत्खनन करता येणार नाही. परवानगीतील अटींचे पालन करणे संबंधित ठेकेदार व व्यक्तींसाठी अनिवार्य राहील.

याशिवाय, वाळू डेपो किंवा साठवण ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले असून, त्याची नोंद संबंधित प्रशासनाकडे उपलब्ध ठेवावी लागणार आहे. प्रत्येक व्यवहाराची नोंद व बिलिंग प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने करणे आवश्यक आहे.

जीएसटी (ऋडढ) नियमांनुसार कर भरणे देखील बंधनकारक असून शासनाच्या महसुलात कोणतीही तूट होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल, पोलीस व खनिज विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# वडीगोद्री येथे प्रशासन आपल्या दारी छत्रपती शिवाजी महाराज स्व समाधान शिबिराद्वारे हजारो नागरिकांच्या समस्यांचा ऑन द स्पॉट निपटारा

## आ. हिकमतदादा उढाण यांच्या उपस्थितीत स्व समाधान शिबिर संपन्न घरकुल लाभार्थ्यांना १.१५ कोटींच्या हप्त्यांचे व मोफत वाळू पत्रांचे वितरण

अंबड शेख फारुक

सामान्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण एकाच छताखाली व्हावे या उद्देशाने मौजे वडीगोद्री येथे छत्रपती शिवाजी महाराज स्व समाधान शिबिर टप्पा-१ उत्साहात पार पडले. घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमतदादा उढाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या शिबिराचा वडीगोद्री मंडळातील १४ गावांतील नागरिकांनी मोठा लाभ घेतला.एकाच छताखाली शासनाचे सर्व विभाग

महसूल, ग्रामविकास, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास यांसह महा-ई-सेवा केंद्र, निवडणूक विभाग आणि पुरवठा विभाग असे सर्व महत्त्वाचे विभाग एकाच ठिकाणी उपलब्ध होते. नागरिकांच्या तक्रारींवर थेट संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यवाही करण्यात आली.महसूल प्रशासनाचा ग्राऊंड झिरो वर राबता

अंबड उपविभागाचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी आणि तहसीलदार विजय चव्हाण यांनी सकाळपासूनच शिबिरात तळ ठोकला होता. जोपर्यंत शेवटच्या नागरिकाचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत हे अधिकारी जागेवर उपस्थित होते. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे नागरिकांनी प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त केले.घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा निधी वितरण मौजे दुनगाव येथील १९९ घरकुल लाभार्थ्यांना १ कोटी १५ लाख रुपयांचा दुसरा हप्ता या शिबिराच्या माध्यमातून वितरित करण्यात आला.

वडीगोद्री मंडळातील १६५ लाभार्थ्यांना घरकुलासाठी ५ ब्रास मोफत वाळू वितरणाचे अधिकृत पत्र उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कृषी आणि महिला सक्षमीकरणावर भर



कृषी विभागामार्फत राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ७ लाभार्थ्यांना ट्रॅक्टर २ लाभार्थ्यांना पॉवर विडर आणि एका लाभार्थ्याला सी.एच.सी.चे वितरण करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या स्टॉलवर महिलांची मोठी गर्दी होती.येथे महिलांची केवायसी घधउ करण्यात येऊन त्यांच्या थकीत हप्त्यांबाबतच्या समस्यांचे तातडीने निराकरण करण्यात आले.

लोकप्रिय मंडळ अधिकारी संदीप नरवटे यांचा सत्कार

गेल्या वर्षभरात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन रस्त्यांचे वाद सामोपचाराने मिटवल्याबद्दल वडीगोद्रीचे मंडळ अधिकारी संदीप नरुटे यांचा ग्रामस्थांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कामामुळे शेतकऱ्यांना न्यायालयाच्या फेऱ्यांपासून मुक्ती मिळाली अशा भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही त्यांच्या कामाचे कौतुक केले.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वी झाले. याकामी गणेश खटके, बाळासाहेब गावडे, रवींद्र खोमणे, सुनील हंगारगे, रोहित पवार आणि महसूल कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन संदीप नरवटे यांनी केले.




# क्रीडा विभागाच्या महत्वकांक्षी मिशन लक्ष वेध या योजनेअंतर्गत लॉनटेनिस व कुस्ती खेळाचे खेळाडू निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत मिशन लक्ष्यवेध योजना ही धोरणात्मक योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत लॉन टेनिस, कुस्ती, बैडमिंटन आणि बॉक्सिंग या क्रीडा प्रकाराकरिता विभागीय क्रीडा निपुणता केंद्र विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करणे प्रस्तावित आहे.

उपरोक्त नमुद विभागीय क्रीडा निपुणता केंद्र कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करणे प्रस्तावित असून तूर्तास लॉन टेनिस आणि कुस्ती या क्रीडा प्रकाराची खेळाडू निवड चाचणी आयोजित करण्यात येणार आहे.

खेळाडू निवड चाचणी करिता निकष पुढील प्रमाणे आहेत :-

१ लॉन टेनिस :- विभागीय क्रीडा निपुणता केंद्रस्तरावरील खेळाडू निवड निकष :- (०१) वयोमर्यादा :- २५ वर्षाआतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेबर रोजी ), (०२) आवश्यक कागदपत्रे :- जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ०३, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र, (०३) अधिवास :- महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे, (०४) क्रीड़ा कामगिरी विवरण :- ढे ३ ठरपज्ञ झश्रर्रूशीं ळप -/ढ-, छरींळेपरश्र ठरपज्ञळपस झश्रर्रूशी, राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (डत्र्ल्लख, -खढ-, घहशश्रे खपवळर छरींळेपरश्र जपश्रू ) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (ऋळींपर्शीी) चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक, (०५) वैद्यकीय तपासणी :- शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैच वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

२ कुस्ती :- विभागीय क्रीडा निपुणता केंद्रस्तरावरील खेळाडू निवड निकष: (०१) वयोमर्यादा :- २५ वर्षाआतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी ), (०२) आवश्यक कागदपत्रे :- जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील कीड़ा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ०३, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र (०३) अधिवास :- महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे, (०४) क्रीड़ा कामगिरी विवरण :- राज्यस्तरावरील पदक किया राज्यस्तरावरील खेळाडू प्राप्त राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (डत्र्ल्लख, थत्र्ख, घहशश्रे खपवळर छर-ींळेपरश्र जपश्रू) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (ऋळींपर्शीी) चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक,

(०५) वैद्यकीय तपासणी :- शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैप वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य आहे. टिप्पणीस विभागस्तरीय लोकप्रिय वर्तमानपत्रात विनामुल्य विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी देऊन क्रीडा विषयक उपक्रमास सहकार्य करावे, अधिकच्या माहिती करिता श्री. तेजस कुलकर्णी, क्रीडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर ( मो. क्र. ८०८७६६१५८९ ), श्री. रेवनाथ शेलार, क्रीडा मार्गदर्शक, बीड ( मो. क्र. ९०७५४७६७९१ ) यांना संपर्क साधावा, असे छत्रपती संभाजीनगर विभागाचे क्रीडा उपसंचालक शेखर पाटील व जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अरविंद विद्यागर यांनी आवाहन केले आहे.

# हिंदुत्व आणि विकासाचा समतोल साधणारे नेतृत्व म्हणजे एकनाथजी शिंदे- अनिलदादा जगताप

शहाजानपूरात शिवसेनेची नवी शाखा स्थापन

बीड (प्रतिनिधी)

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या रक्षणासाठी भगवा झेंडा हाती घेऊन उभारलेली शिवसेना आजही त्याच विचारांनी पुढे जात आहे. या विचारांना जपत महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब कार्य करत असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील शहाजानपूर येथे काल दि. २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता शिवसेनेच्या नव्या शाखेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास अनिलदादा जगताप प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडवून न्याय दिला. लाडकी बहीण योजना, शेतकरी योजना, विद्यार्थी योजना यांसारख्या लोकहितकारी योजनांमुळे त्यांनी जनतेच्या मनात लाडके मुख्यमंत्री म्हणून स्थान निर्माण केले. आम्ही गेली ४० वर्षे श्रध्येय बाळासाहेबांचे विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहोत. शहाजानपूर गावातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि गोरगरिबांच्या सेवेसाठी ही शाखा स्थापन करण्यात आली असून पुढेही आम्ही सातत्याने काम करत राहू, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले यांनी केले. शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या जिल्हा समन्वयक उज्वलाताई भोपळे आणि युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे यांनी आपल्या भाषणातून पक्षाची कार्यपद्धती व ध्येयधोरणे स्पष्ट केली. कार्यक्रमात शहाजानपूर शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शाखाप्रमुख नवनाथ घाटूळ, उपशाखाप्रमुख गणेश जोगदंड, सचिव सूर्यभान बादाडे, सहसचिव नारायण बादाडे, कोषाध्यक्ष गजानन बादाडे तसेच सदस्यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान, प्रहार संघटनेचे युवक तालुकाध्यक्ष हरीश जाधव यांनी शिवसेनेत प्रवेश केला.



याप्रसंगी शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनील भाऊ अनभुले, युवासेना जिल्हाप्रमुख गणेश शिराळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या तालुका समन्वयक वैशालीताई आगे, आकाश भैय्या जगताप, प्रतिक कांबळे, धोंडीरामजी जाधव, ड.धर्मेंद्र भोपळे, सचिन कराळे, पत्रकार धनंजय माने, रामभाऊ आगे, सरपंच रामचंद्र डोईजड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक डोळे यांनी केले.

# चोंडीत अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेची सांगता

## शिव-पार्वती विवाह सोहळ्याने भाविक मंत्रमुग्ध

मुखेड (प्रतिनिधी)

तालुक्यातील चोंडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत महापुराण कथा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरलेल्या भगवान महादेव आणि माता पार्वती यांच्या विवाह सोहळ्याने उपस्थित भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. १९ मार्च ते २६ मार्च दरम्यान चाललेल्या या कार्यक्रमामुळे संपूर्ण चोंडी परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता.

शिव-पार्वती विवाह सोहळा

सप्ताहातील विशेष प्रसंगी महादेव आणि पार्वतीच्या विवाहाचा प्रसंग जिवंत करण्यात आला. यामध्ये विजयकुमार जयशिंगराव पाटील बोडके यांनी महादेवाची, तर पूजा विजयकुमार पाटील बोडके (भावी पंचायत समिती सदस्या) यांनी माता पार्वतीची भूमिका साकारली. या विवाह सोहळ्यासाठी चोंडीसह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. विवेक पाटील चोंडीकर आणि माजी सरपंच राजू पाटील चोंडीकर यांच्यासह समस्त ग्रामस्थ या मंगल प्रसंगाचे साक्षीदार झाले.

प्रेमानंद महाराजांचे रसाळ निरूपण

या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय भागवत कथाकार ह.भ.प. श्री प्रेमानंद महाराज शास्त्री (वृंदावन-आळंदी) यांच्या रसाळ वाणीतून भागवत कथेचे निरूपण करण्यात आले. त्यांनी आपल्या प्रवचनातून भक्ती, सदाचार आणि मानवतेचा संदेश दिला. कथेतील विविध प्रसंगांमुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

नियोजन आणि सहभाग



कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि माजी उपसरपंच राजू पाटील यांच्या पुढाकारातून हा सोहळा यशस्वी झाला. राजू पाटील गेल्या अनेक वर्षांपासून गावात धार्मिक आणि सामाजिक कार्याची परंपरा जोपासत आहेत. राजू पाटील मित्र मंडळ, सर्व ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांच्या अथक परिश्रमामुळे सातही दिवस शिस्तबद्ध पद्धतीने अन्नदान, भजन आणि कीर्तनाचे कार्यक्रम पार पडले.

सप्ताहाच्या सांगता प्रसंगी मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा सोहळा चोंडी गावाच्या इतिहासात संस्मरणीय ठरला आहे.

# पॅन इंडिया चित्रपट ' नागबंधन ' ३ जुलै २०२६ रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार

राम नवमीच्या मुहूर्तावर ' नागबंधन ' ची रिलीज डेट जाहीर; विराट कर्णा-ऋषभ साव्हनी यांची मिथ-ॲडव्हेंचर फिल्म ३ जुलै २०२६ ला प्रेक्षकांच्या भेटीला. बहुप्रतीक्षित पॅन इंडिया चित्रपट ' नागबंधन ' ची रिलीज डेट अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. निर्मात्यांनी हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित करण्याची घोषणा केली असून, यामुळे देशभरातील प्रेक्षकांमध्ये उत्सुकता अधिक वाढली आहे. राम नवमीच्या शुभमुहूर्तावर निक स्टुडिओ आणि अभिषेक पिक्चर्स यांनी दमदार पोस्टरसह चित्रपटाची रिलीज डेट जाहीर केली. यापूर्वी चित्रपटाचा टीझर आणि नमो रे हे गाणे प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरले होते. नवीन पोस्टरमध्ये मुख्य कलाकार विराट कर्णा आणि ऋषभ साव्हनी प्रभावी अंदाजात दिसत असून, त्यात पौराणिकता आणि आधुनिकतेचा अनोखा संगम पाहायला मिळतो. पोस्टरमध्ये सर्प, त्रिशूल आणि मंदिरातील कलाकृतींचा समावेश असून, चित्रपटाच्या रहस्यमय आणि आध्यात्मिक कथानकाची झलक यातून मिळते. या चित्रपटाचे दिग्दर्शन अभिषेक नाम यांनी केले आहे, तर निर्मिती किशोर अन्नापरेड्डी आणि निशिता नागिरेड्डी यांनी केली आहे. चित्रपटाची कथा पौराणिक घटक आणि आधुनिक ॲडव्हेंचर यांचा संगम दाखवते. ' नागबंधन ' मध्ये नभा नटेश, ईश्वार्या मेनन, महेश मांजरेकर आणि जगपति बाबू हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. निर्मात्यांच्या मते, चित्रपटातील पात्रे भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैविध्याचे प्रभावी दर्शन घडवतील. चित्रपटाचे संगीत जुनैद कुमार आणि अभे यांनी तयार केले आहे.





छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई

# विजेचे दर कमी होणार

मुंबई : प्रतिनिधी

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वीज दर निश्चितीबाबत फेरसुनावणी घेऊन राज्य वीज नियामक आयोगाने आपल्या पूर्वीच्याच निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. पुढील ५ वर्षात सर्वच प्रवर्गातील ग्राहकांना पुरवण्यात येणा-या विजेचे दर टप्प्याटप्प्याने कमी होणार असून, याची सुरुवात १ एप्रिलपासून होणार आहे. स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांना दिवसा विजेच्या दरात सवलत मिळणार आहे.

राज्य वीज दर नियामक आयोगाने २०२५ ते २०३० या ५ वर्षांसाठी विजेचे दर मागच्या वर्षी मार्च महिन्यात निश्चित करून दिले होते. मात्र, या निर्णयाला आव्हान देऊन पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली. त्यावरही आयोगाने जून महिन्यात आपला निर्णय दिला. या निर्णयाला पुढे मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. महावितरणची बाजू ऐकून घेण्यात आली नाही म्हणून उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर बोट ठेवले व जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा निर्णय कायम



ठेवला. त्यामुळे राज्य विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर पुन्हा जनसुनावणी घेतली. नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आज आपला निर्णय जाहीर केला. वीज दर कपातीबाबतच्या आधीच्या निर्णयावर आयोगाने शिक्कामोर्तब केले.१०० ते ३०० युनिट वापर असलेल्या ग्राहकांसाठीचा दर १३ रुपये १७ पैशावरून कमी होऊन १२ रुपये ९४ पैसे होईल. उच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठीचा दर १० रुपये ७७ पैसे प्रती युनिटवरून कमी होऊन १० रुपये ७१ पैसे इतका होईल. याशिवाय स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीतील वापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळेल. उद्योगांना व व्यावसायिक वीज ग्राहकांना सकाळी ८ ते दुपारी ५ या कालावधीतील वीज वापरासाठीची टीओडी सवलत चालूच राहणार आहे. या ग्राहकांना वीज दरात एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च महिन्यात २५ टक्के सवलत मिळणार आहे.

# अजित दादा हे पुरोगामी विचाराचे पुरस्कर्ते होते - ॲड.उषा दराडे

## अजित स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प समर्पित




बीड (प्रतिनिधी)
स्व.यशवंतराव चव्हाण आणि युगपुरुष शरदचंद्र पवार यांचा वैचारीक वारसा पुढे चालवण्याचे काम अजित दादा पवार यांनी केले. शाहु-फुले-आंबेडकर यांचे पुरोगामी विचार आणि राज्य घटनेनुसार सार्वजनिक वर्तन हे अजित दादांच्या कार्यपध्दतीचे वैशिष्ट्य होते. प्रामुख्याने महिलांचा सन्मान करण्याची संस्कृती पवार कुटुंबाने वृध्दींगत केली.अजित दादांसारख्या नेतृत्वाची या राज्याला खर्या अर्थाने आज गरज असताना त्यांचे झालेले निधन ही फार मोठी हानी आहे. हा अपघात नव्हे तर घातपातच वाटतो. ज्यांनी कुणी हे घडवून आणले असेल त्यांना शिक्षा होण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे हीच दादांना खरी श्रध्दांजली ठरेल असे प्रतिपादन माजी आ.ॲड.उषाताई दराडे यांनी केले. अजित स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प समर्पित करताना त्या बोलत होत्या.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने बीडमध्ये लोकनेते अजित दादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला व्याख्यानमालेच्या माध्यमातून स्मृतीदिन साजरा करण्यात येत आहे. २८ फेब्रुवारी रोजी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांच्या व्याख्यानाने सुरुवात झाली. तर दुसरे पुष्प दिनांक २८ मार्च रोजी ॲड.उषाताई दराडे यांना निमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड न.प.चे उपाध्यक्ष विनोद मुळूक हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, दै. सिटिझनचे संपादक शेख मुजीब,निमा डॉक्टर्स संघटनेचे अध्यक्ष डॉ.अजित जाधव , बीड न.प.चे स्वच्छता सभापती शेख निजाम, कल्याण काका आखाडे,सौ.प्रज्ञाताई खोसरे,

ज्येष्ठ पत्रकार जगदीश पिंगळे, संपादक वैभव स्वामी,विशाखा ढोले, आम्रपाली साबळे, सामाजिक कार्यकर्ते कलंदर काका पठाण, युवा नेते इंजि.अजिंक्य आणेराव, सरलाताई पवार ,प्रणिताताई पवार, अर्चनाताई देशमुख,खंडागळे ताई आदीच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांनी अजित दादांच्या जीवनावरील पुस्तक भेट देवून पाहुण्यांचे स्वागत केले.

या प्रसंगी बोलतांना ॲड.दराडे म्हणाल्या की, अजित दादा पवार यांची खरी ओळख कामाचा माणूस हीच होती. आपल्या राजकिय जीवनात त्यांनी किती जणांना वैयक्तीक आणि सार्वजनिक मदत केली असेल याची मोजदाद होवू शकत नाही.आज दादांच्या निधनानंतर देशभरातील असंख्य लोक हळहळ व्यक्त करत आहेत. माझ्या व्यक्तीगत जीवनात मला विधान परिषदेवर आमदार करण्यामध्ये,राज्य महिला आयोगावर सदस्य करण्यामध्ये अजित दादांचे फार मोठे योगदान होते. माझ्या व्यक्तीगत जीवनात सुध्दा एका संकटातून त्यांनी मला बाहेर काढले होते. जेव्हा अजित दादा हे पवार साहेबांना सोडून दुसर्या मार्गाने गेले तेव्हा मी त्यांची राजकिय विरोधक म्हणून अनेकदा टिका केली. परंतु या टिकेला माझ्या घरातूनच माझ्या मुली विरोध करत होत्या. यावरुन दादांची लोकप्रियता लक्षात येते. आर.आर.पाटील, दिलीप वळसे पाटील,अनिल देशमुख,छगन भुजबळ या सहकार्यांसोबत दादांनी महाराष्ट्राचे राजकारण सामाजिक समतेच्या दिशेने पुढे नेले. त्यांच्या मनाला कधीही जातीयवादाने स्पर्श केला नाही. ते मुलत: पुरोगामी विचाराचे होते. अपघाती निधनापुर्वी त्यांनी राजकारणामध्ये ज्यांची साथ धरली होती त्यांना सोडून पुन्हा मुख्य प्रवाहात येण्याचे ठरवले होते. परंतु घात झाला. दादांच्या मृत्यूचे शल्य प्रत्येकाच्या मनात आहे. ज्यांनी कोणी हा घात केला असेल त्यांना शोधुन काढण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे उषाताई म्हणाल्या. श्रीमती सुनेत्राताई पवार या सुध्दा पुरोगामी विचाराच्या असून भविष्यात महाराष्ट्राला सक्षम नेतृत्व देण्याची क्षमता त्यांच्यात आहे. त्यासाठी आपण सर्वजण सुनेत्राताईंच्या पाठीशी उभे राहू असेही ॲड.दराडे म्हणाल्या.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोक पत्रकार भागवत तावरे यांनी केले. विनोद मुळूक यांनी अध्यक्षीय समारोप करताना अजित दादांच्या अनेक आठवणी सांगितल्या. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी व्याख्यान माला आयोजित करण्या मागची भूमिका विशद केली.निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ.अजित जाधव यांनी आपल्या भाषणात अजित दादांच्या सहवासात आलेले अनुभव सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिक कांबळे यांनी केले.भगवान विद्यालयातील विद्यार्थीनींनी या प्रसंगी सुश्राव्य गीत सादर केले.

# बौद्ध संस्कार विधींमध्ये सम्राट अशोकांची प्रतिमा लावण्याचे आवाहन



बीड (प्रतिनिधी)
बौद्ध धर्मीयांच्या संस्कार विधींमध्ये तथागत भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसोबतच चक्रवर्ती सम्राट अशोक यांची प्रतिमा किंवा मूर्ती अनिवार्यपणे ठेवावी, असे आवाहन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा)च्या संस्कार विभागामार्फत करण्यात आले आहे.संस्थेचे कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी यासंदर्भात मार्गदर्शन करताना सांगितले की, बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनामध्ये सम्राट अशोक यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे बुद्ध धम्म भारतात व्यापक प्रमाणात प्रसारित झाला. त्याच परंपरेला पुढे नेत, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार करून या देशाला पुन्हा बुद्धधर्माची दिशा दिली.

या ऐतिहासिक योगदानाच्या पार्श्वभूमीवर, प्रत्येक बौद्ध संस्कार विधीत तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबतच चक्रवर्ती सम्राट अशोक यांचे स्थान अधोरेखित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे विवाह, नामकरण, गृहप्रवेश यांसारख्या सर्व धार्मिक विधींमध्ये सम्राट अशोक यांची प्रतिमा किंवा मूर्ती ठेवूनच विधी पार पाडावेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.बौद्ध समाजाने सम्राट अशोकांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा सन्मान राखावा आणि पुढील सर्व संस्कार विधी या नव्या पद्धतीने पार पाडावेत, अशी अपेक्षा देखील डॉ. भीमराव आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती चौसाळा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पंकज रूपवते



बीड (प्रतिनिधी)
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती दरवर्षी सालाबादा प्रमाणे याहीवर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे अयोजन करुन साजरी करण्यासाठी भिमनगर चौसाळा येथील बुध्द विहारात रिपाइंचे बीड जिल्हा उपाध्यक्ष बापु पवार, चौसाळा ग्रामपंचायतीचे सदस्य किशोर ढोकणे . चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर. भाजपा दलित आघाडीचे बीड तालुकाध्यक्ष पवन कुचेकर. राजगृह बॉईज ग्रुपचे अध्यक्ष विपुल चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेवून सर्वानुमते जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी घोषीत करण्यात आली.

अध्यक्षपदी पंकज रूपवते, उपाध्यक्षपदी संकेत चव्हाण, सचिवपदी विनोद घोडके सहसचिव विजय जाधव तर कार्याध्यक्षपदी साहिल चव्हाण यांची निवड करण्यात आली. तसेच खालील प्रमाणे कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात आली.

दि. १४ एप्रील रोजी सकाळी ९ वाजता ध्वजारोहनाचा कार्यक्रम भिमनगर बौद्ध विहार येथे होईल. व सायंकाळी लहान मुलांचा गायन व नृत्य स्पर्धा होणार असून तसेच दि.२६ एप्रील रोजी भिमनगर येथील बौद्ध विहारा समोर भोजनाचा कार्यक्रम दुपारी १ ते आपल्या आगमनापर्यंत सुरु राहिल. दि.२७ एप्रील रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक भिमनगर येथून सायंकाळी ठीक ५ वाजता काढण्यात येणार आहे.

यावेळी भिम नगर बौद्ध विहार, चौसाळा येथे आयोजित बैठकीस भाऊसाहेब आण्णा चव्हाण, हौसेराव वाघमारे, प्रभु म्हस्के, आनंतराव घोडके, बापु चव्हाण, वसंत चव्हाण, शहादेव चव्हाण, बबन पवार, बबन जावळे, विकास चव्हाण, महादेव पवार, बाळू पवार, बारीकराव घोडके, रवि पवार, गौतम रूपवते, विलास लगाडे, कैलास वाघमारे नितीन कांबळे, विलास वाघमारे, शिवाजी चव्हाण मोहन शिरसाळे, सुभाष आदमाने, महेंद्र चव्हाण, किरण चव्हाण, सागर पवार, विकी सिरसाळे, आदित्य रूपवते, रोहित जावळे, प्रविण सोनवणे, प्रमोद रूपवते, सचिन चव्हाण, विजय चव्हाण, विशाल चव्हाण, अमोल जावळे, राम घोडके, संकेत वाघमारे, किरण धन्वे, किरण जाधव, आशोक चव्हाण, प्रकाश ढोकणे, अजय चव्हा, अमोल चव्हाण, अमित चव्हाण रवि खंकाळ, प्रथमेश पवार, दिनेश सोनवणे, लखन मोरे, विशाल गायकवाड, मंगेश पवार, मंगेश वाघमारे, माणिक चव्हाण, सिद्धार्थ चव्हा, मिलींद मस्के, प्रविण चव्हाण, कुमार पवार, संजय चव्हाण, राज सोनवणे, अक्षय पवार, विकी चव्हाण, किरण चंदनशिवे, पप्पू घोडके, राहूल भोसले भिमराव गायकवाड सह राजगृह बॉईज भिमनगर ग्रुपचे कार्यकर्ते भिमसैनिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थीत होत्या.

## डिजिटल परिवर्तनाची दमदार झेप...

# छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय ई- गव्हर्नन्समध्ये राज्यात द्वितीय




छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)
छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने ई-गव्हर्नन्स क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी ही प्रशासनातील डिजिटल परिवर्तनाची ठोस साक्ष ठरली आहे. महाराष्ट्र शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय मूल्यमापनात या कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत शासकीय कार्यालयांच्या कार्यपद्धतीचे संकेतस्थळ व्यवस्थापन, 'आपले सरकार' सेवा, ई-ऑफिस प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), ऋखड तंत्रज्ञान तसेच नागरिकांशी संवाद यांसारख्या विविध निकषांवर मूल्यमापन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने या सर्वच निकषांमध्ये प्रभावी कामगिरी करत एक आदर्श निर्माण केला आहे.

कार्यालयाच्या संकेतस्थळामध्ये वापरकर्ता सुलभता, जलद पेज लोडिंग, मोबाईल सुसंगतता आणि थउ-ऋ २.० मानकांनुसार प्रवेशयोग्यता सुनिश्चित करण्यात आली आहे. तसेच छखउ मार्फत सुरक्षा ऑडिट करून संकेतस्थळ अधिक सुरक्षित करण्यात आले आहे. नागरिकांना आवश्यक माहिती, आरटीएस सेवा, विविध शासकीय योजना तसेच डॅशबोर्डच्या माध्यमातून कामकाजाची अद्ययावत माहिती सहज उपलब्ध करून देण्यात येत आहे.

'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून विविध सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देत नागरिकांना घरबसल्या सेवा मिळवून देण्यात येत आहेत. तक्रार निवारण वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला असून अपीलचे प्रमाण अत्यल्प राखण्यात यश मिळाले आहे.

ई-ऑफिस प्रणालीचा वापर करून कार्यालयीन कामकाज पूर्णपणे डिजिटल करण्यात आले आहे. यामुळे फाईल निपटारा कालावधी २०-३० दिवसांवरून ७-१५ दिवसांपर्यंत कमी झाला आहे. डिजिटल स्वाक्षरी आणि ई-साइनचा प्रभावी वापर करून कामकाज अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्यात आले आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) आधारित साधनांचा वापर करून पत्रव्यवहार, नोंदी तयार करणे, डेटा विश्लेषण आणि निर्णय प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यात आली आहे. याचबरोबर -ख आधारित शेती उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांना डेटा-आधारित मार्गदर्शन देण्याचे कामही करण्यात आले आहे.नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी थहॉी-ींउिहरींलीं आणि थहॉी-ींउिहरप-पशश्र तयार करण्यात आले असून, त्याद्वारे शासकीय योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया, अर्जाची स्थिती आणि तक्रार निवारण सुलभ करण्यात आले आहे.

ऋखड तंत्रज्ञानाच्या साहाय्याने १५० हून अधिक स्तर तयार करून प्रशासकीय सीमा, पायाभूत सुविधा, जलपुरवठा, रस्ते, आरोग्य व शिक्षण सुविधांचे सविस्तर मॅपिंग करण्यात आले आहे. उपग्रह व ड्रोन प्रतिमांच्या मदतीने अचूक डेटा संकलित करून शहरी नियोजन, कर वसुली आणि प्रशासनिक निर्णय प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. झच् ऋींळ डहरर्ज्ञीं प्लॅटफॉर्मशी एकत्रीकरण तसेच 'णऊ-छ' प्रकल्पाद्वारे डिजिटल पत्ता प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

हिंगोली, जालना आणि लातूर जिल्ह्यांमध्येही ऋखड आधारित उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले असून ग्रामीण रस्ते, शासकीय जमिनी आणि पायाभूत सुविधांचे मॅपिंग प्रभावीपणे करण्यात आले आहे.

या सर्व उपक्रमांच्या एकत्रित परिणामामुळे कार्यालयीन कार्यक्षमता, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख सेवा वितरणामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. त्यामुळेच छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक मिळवत ई-गव्हर्नन्स क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. भविष्यातही आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याचा संकल्प या यशातून अधोरेखित झाला आहे.

## अखिल भारतीय ग्राहक पंचायतची

# जिल्हा कार्यकारणी जाहीर



छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)
छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती.संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.या बैठकीत सर्वानुमते संघटनेच्या पुढील तीन वर्षाकरिता जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकारी आगामी काळात आखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या माध्यमातून होणाऱ्या कार्यक्रमा बदल चर्चा झाली. तदनंतर अखिल भारतीय ग्राहक पंचायत संभाजीनगर जिल्हा कार्यकारणीची निवड करून देवगिरी प्रांत संघटक . रामदास ठोंबरे यांनी जिल्हा कार्यकारणी घोषित केली.यावेळी कार्यक्रमास देवगिरी प्रांताचे अध्यक्ष डॉ.विलास मोरे,उपाध्यक्ष सौ.स्मिता अवचार, सौ.संगीता धुमाळ, श्रीमती संगीता धारूरकर, ओंकार जोशी, रवींद्र पिंगळीकर, राजेश मेहता,सौ.भारती भांडेकर,सौ.जयश्री एकबोटे,श्री नागेशजी गव्हले, नानक वेदी, महेन्दकुमार सकलेचा श्री अजयकुमार पाडे, नरेश पटवर्धन, शिवाजी शेटे,,मीनल ईप्पर,सिदवाडकर, आदि जेष्ठ कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारणी या प्रमाणे छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष धन्यकुमार मंडलेचा. उपाध्यक्ष रामेश्वर सेलूकर, .संतोष छाजेड, जिल्हा सचिव .नागेश गव्हले , सहसचिव अजयकुमार पांडे, प्रमोदजी कापसिकर, महावीर पहाडे,जिल्हा कोषाध्यक्ष राजाभाऊ पवार, सह कोषाध्यक्ष शरद देशपांडे,जिल्हा महिला प्रमुख ड.ज्योती पत्की, महिला उपप्रमुख ड.पूजा मुंढे,कल्पना राजपूत, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रकाश कुलकर्णी,पंडित ठोंबरे, जिल्हा पर्यावरण प्रमुख श्री शरद लासुरकर,सौ.सुवर्णा देशमुख, सौ.शर्मिष्ठा, जिल्हा रोजगार सुजन प्रमुख डॉ.सुषमा सोनी, कु. हेमलता तासमल,जिल्हा लीगल सेल प्रमुख ड.जयश्री एकबोटे,मामिडवार, जिल्हा आय टी सेल प्रमुख सौ.योगिता बेडसुरे,कैलास शंकर नाडे जिल्हा ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख महेंद्रकुमार सकलेचा ,विकास भावठाणकर जिल्हा सदस्य नरेश पटवर्धन,सौ.कामवत, अनिता,श्री अजय भोळेकर, दत्तात्रेय रासकर, राजेन्द कुळकर्णी, अनिल काथार, बालचंद अजमेरा,आदिची निवड करण्यात आली आहे,

# श्री क्षेत्र महादेव मंदिर खडकेश्र्वर येथे भव्य यात्रा, अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळा



मुक्रमाबाद (प्रतिनिधी)
मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद (खडकेश्र्वर ) येथील प्राचीन चालुक्य कालीन हेमाडपंथी मंदिर आहे मंदिरात तीन शिवलिंग स्थापित आहेत ब्रम्हा, विष्णू, महेश, आहेत असे आख्यायिका आहे.नवसाला पावणारा शंभू महादेवाचे दर्शन घेण्यासाठी कर्नाटक, आंध्र, महाराष्ट्र, राज्यातुन भक्त श्रध्देने दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी होते. प्रति वर्षाप्रमाणे बारसला भव्य यात्रा, अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा प्रारंभ होते.

सप्ताह प्रारंभ चैत्रशुद्ध १२ रोज सोमवार दि.३०/०३/२०२६ ते सांगता चैत्र कृष्णपक्ष ४ दि.०६/०४/२०२६ रोज सोमवार या शुभ दिनी सद्गुरू राष्ट्रसंत ष.ब्र. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज (राजुर मठ ) यांच्या कृपा आशीर्वादाने अखंड शिवनाम सप्ताहाचे - आयोजन केले आहे तरी सर्व भावी भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा व आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे.

श्री ची रथातून भव्य मिरवणूक व भस्म उधळण दि.०४/०४/२०२६ शनिवारी पहाटे ५ वाजता संपन्न होणार आहे. दि.०७/०३/२०२६ रोज मंगळवार स.६ वा.श्री ची पालखी तुन मिरवणुक निघेल.

...सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम...

पहाटे ५ ते ६ शिवपाठ ६ ते ८ महारुद्राभिषेक १० ते ०१ ग्रंथराज परमरहस्य पारायण ४ ते ६ गाथा भजन रात्री ९ ते १२ शिव कीर्तन १ ते ३ शिवजागर होईल. सप्ताहातील शिव कीर्तनकार पुढील प्रमाणे दि.३०/०३/२०२६ रोज सोमवार शि.भ.प.तानाजी पाटील दि.३१/०३/२०२६ रोज मंगळवार शि.भ.प.नागेश स्वामी कुरुंदवाडीकर दि.०१/०४/२०२६ रोज बुधवार शि.भ.प.शिवानंद महाराज हैबतपुरे दि.०२/०४/२०२६ रोज गुरुवार शि.भ.प.संजय महाराज येळापुरे दि.०३/०४/२०२६ रोज शुक्रवार शि.भ.प. त्र्यंबक स्वामी नंदगावकर दि. ०४/०४/२०२६ रोज शनिवार शि.भ.प. मोहनराव कावडे महाराज हसनाळीकर दि.०५/०४/२०२६ रोज रविवार दुपारी ४ वाजता टाळ आरतीचे कीर्तन शि.भ.प.सखाराम महाराज सोनटक्के यांचे होईल आणि संध्याकाळी शि.भ.प.संगमेश्वर महाराज वलांडिकर यांचे

दि.०६/०४/२०२६ रोज सोमवार स. १० वा.श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज पलसिध्द मठ साखरखेर्डा यांचे महाप्रसादाचे कीर्तन होईल.तरी परिसरातील व गावातील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा अशी विनंती श्री महादेव मंदिर संस्थानचे सर्व सदस्य, पुजारी राचप्पा स्वामी व समस्त गावकऱ्यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# मार्च अखेरीस पाणीसाठा निम्म्यावर

## एक प्रकल्प कोरडा ; नियोजनाची गरज



परळी / अनुप कुसुमकर

मान्सूनकाळात परळी तालुक्यात पावसाने सर्वत्र दमदार हजेरी लावली. तालुक्यातील सर्वच मध्यम, लघु प्रकल्प तुडुंब भरले मात्र जशी जशी उन्हाची तीव्रता वाढत आहे तसे प्रकल्पातील पाणी साठ्यात कमालीची घट होताना दिसून येत आहे. तालुक्यातील ३ मध्यम प्रकल्पात सरासरी ५३ टक्के तर लघु प्रकल्पात सरासरी ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून कातकरवाडी येथील लघु प्रकल्प मार्च अखेरीस कोरडा पडला. एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यात उन्हाची तीव्रता, पाण्याचे बाष्पीभवन या सर्वांचा विचार करता उपलब्ध पाणीसाठा याचा परिपूर्ण नियोजन करून वापर करणे महत्वाचे आहे.

परळी तालुक्यातील मुख्य जलस्रोत म्हणून नागापूर येथील वाण धरण अतिशय महत्त्वाचे आहे. परळी शहर व तालुक्यातील पंधरा गावासाठी नागापूर येथे वाण नदीच्या पात्रात धरण बांधण्यात आलेले आहे. मान्सूनच्या पावसाने हे वाण मध्यम प्रकल्पासह अनेक लघु व मध्य प्रकल्प १०० टक्के भरत मोठ्या प्रमाणावर जलसाठा निर्माण झाला होता. असे असताना उन्हाळ्याच्या सुरुवातीला मार्च अखेरिस उपलब्ध पाणीसाठ्यात कमालीची घट होताना दिसून येत असून तालुक्यातील कातकरवाडी येथील लघु साठवण तलाव कोरडा पडला आहे. विद्यमान परिस्थिती लक्षात घेता पुढील तीन महिन्याचे नियोजन करून पाणी वापर करणे महत्वाचे असणार आहे.

मार्च महिना संपत आला असून तालुक्यातील नागापूर येथील वाण मध्यम प्रकल्पात ६८ टक्के, बोधेगाव मध्यम प्रकल्पात ४८ टक्के तर बोरणा मध्यम प्रकल्पात ४५ टक्के पाणी साठा शिल्लक आहे. वाण मध्यम प्रकल्पातील पाण्यावर परळी शहरातील दीड लाख लोक आणि अनेक गावखेड्यातील नागरिकांची भिस्त आहे. येत्या मान्सून काळात परळी तालुक्यात दमदार पाऊस न झाल्यास परळी शहरासह एकूणच तालुक्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, उपलब्ध पाणी काटकसरीने वापरून पशु आणि नागरिक यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे बनले असून प्रशासन व नागरिकांनी सध्या उपलब्ध असलेले पाणी नियोजन करून वापर करणे आवश्यक बनले आहे.

# आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा- ह.भ.प. संजय महाराज घोडके



आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील अंभोरा येथे कै. पांडुरंग लक्ष्मण काळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेला धार्मिक कार्यक्रम अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यानिमित्त आयोजित प्रवचनात ह.भ.प. भागवत धर्म प्रसारक संजय महाराज घोडके यांनी उपस्थित भाविकांना जीवनमूल्यांवर मार्गदर्शन करताना आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे असा मोलाचा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात हरिनामाच्या गजरात व विधीवत पूजनाने झाली. राम कृष्ण हरी या नामघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी गावातील व परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून प्रवचनाचा लाभ घेतला. प्रवचनादरम्यान संजय महाराज घोडके यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीवर भाष्य करताना सांगितले की, आधुनिक युगात माणूस आपल्या कर्तव्यांपासून दूर जात असून विशेषतः आई-वडिलांच्या सेवेकडे दुर्लक्ष होत आहे. जोपर्यंत आई-वडील जिवंत आहेत, तोपर्यंत त्यांची सेवा करणे हे प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे. त्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा मानली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. ते पुढे म्हणाले की, मानवी जीवन अत्यंत क्षणभंगुर असून ते पाण्याच्या बुडबुड्यासारखे आहे. त्यामुळे या अल्पकाळात माणसाने सत्कर्म, ईश्वरसेवा आणि नामस्मरण यालाच प्राधान्य द्यावे. संसारातील सुख-दुःखांचे उदाहरण देताना त्यांनी स्पष्ट केले की, भौतिक सुखे ही मृगजळाप्रमाणे भासमान असतात, तर खरे समाधान, शांती आणि आनंद हा केवळ ईश्वरनामातच मिळतो. अखंड नामस्मरण हा जीवनातील खरा आनंद मिळवण्याचा एकमेव मार्ग आहे. नामस्मरणाने मन शुद्ध होते आणि आत्मिक समाधान प्राप्त होते, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रभावी व हृदयस्पर्शी प्रवचनामुळे उपस्थित भाविकांना जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मिळाला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत परिश्रम घेतले.

# देहाची अनासक्ती आणि मोहमायाचा त्याग हे भक्तीचे एक लक्षण - ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री



केज/प्रतिनिधी

ज्यांना देहाची आसक्ती नाही,जे शरीरा विषयी उदासीन आहे तसेच ज्यांच्या मनातील सर्व अशा पाश त्याग केला आहे हे भक्तीचे लक्षण आहे असे प्रतिपादन ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री वरपगावकर यांनी केले. विडा येथे प्रतिवर्षाप्रमाणे चालत असलेल्या राजा हनुमान महाराज जन्मोत्सव सोहळ्यातील आयोजित नाम सप्ताह किर्तन प्रसंगी बोलत होते.यावेळी त्यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांनी भक्ताची जी लक्षणे आहेत तो दर्शविणारा अभंग निरुपणाकरिता घेतला.

भक्त ऐसे जाणा जे देही उदास।गेले अशा पाश निवारुनी।। विषय तो त्यांचा झाला नारायण ।

नावडे धन जन माता पिता।।निर्वाणी गोविंद असे मागे पुढे।काहीच साकडे न पडू नेदी।।

तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे सहाय्य। घातलिया भये नरका जाणे ।।

पुढे बोलताना त्यांनी जो देवापासून विभक्त नाही तो भक्त,देवाशी वियोग नाही तो योगी जोदेवाच्या स्वरूपाला प्राप्त झाला तो ज्ञानी असे भगवत भक्तांचे अनेक लक्षण असून त्यातील काही लक्षणे या अभंगातून महाराजांनी सांगितले त्यापैकीच त्यांचा विषय फक्त नारायण झालेला असतो त्यांना धन जन माता पिता कोणीच आवडेनासा होतो आणि अशा भक्तांचा संभाळ प्रत्यक्ष गोविंद करतो. यासाठी चांगल्या कर्माला सर्वांनी सहाय्य करावे असे म्हटले या प्रसंगी दादा महाराज मेटे, सखारामजी कदम, कल्याण आप्पा येवतेकर,तुषार महाराज, श्रीमंत भोसले,अशोक पटाईत,काका जाधव बबन पवार या भजनी मंडळीसह सोपान काका कुंभार,बाबासाहेब पटाईत,समीर सिंह देशमुख,पांडुरंग पवार, बळीराम देशमुख,संतोष भुजबळ,दत्ता पटाईत यांच्या सह बहुसंख्येने श्रोतावर्ग उपस्थित होता.

# सुरक्षा रक्षकांची संख्या जैसे थे ठेवण्यासाठी मार्डच्या डॉक्टरांचे अधिष्ठाता यांना निवेदन!



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील स्वा.रा.तीर्थ ग्रामीण रुग्णालयात अँड.इस्माईल चौधरी यांना मारहाण झाल्याच्या निषेधार्थ संबंधित सुरक्षा रक्षकावर कारवाई करण्यात यावी व अँड. चौधरी व एम आय एमचे नेते शेख रमीज यांच्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे व रूग्णालयातील सुरक्षा रक्षकांना कामावरून काढून टाकण्यात यावे ,यासाठी आज उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.परंतू,दुसरीकडे संबंधित रुग्णालय परिसर,वसतीगृहाची सुरक्षितता लक्षात घेता सुरक्षा रक्षकांची संख्या कमी न करता ती कायम ठेवावी अशा आशयाचे निवेदन स्वा.रा.तीर्थ रूग्णालयातील मार्ड संघटनेच्या डॉक्टरांनी दिल्याने आज दिवसभर रुग्णालयाची चर्चा संपूर्ण बीड जिल्ह्यात होत आहे.

आज दुपारी अंबाजोगाईत अँड.इस्माईल चौधरी यांच्या मारहाण प्रकरणी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला.या मोर्चात माजी आमदार पृथ्वीराज साठे,राष्ट्रवादी काँग्रेस चे राजकिशोर मोदी, अमर देशमुख, मनसेचे सुनिल जगताप, राजेश वाहुळे सह आदी राजकीय कार्यकर्त्यांनी भाग घेवून निषेध केला होता.

तर दुसरीकडे आजच स्वा.रा.तीर्थ ग्रामीण रुग्णालयातील (मार्ड) संघटनेतील निवासी डॉक्टरांनी अधिष्ठाता धपाटे यांना एक निवेदन दिले.त्यात म्हटले आहे की,आपल्या महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील सुरक्षा व्यवस्था सुरळीत राखण्यासाठी चडक्र जवानांचे मोठे योगदान आहे.रुग्णालयामध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची ये-जा होत असते.अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखणे आपत्कालीन परिस्थिती हाताळणे तसेच कर्मचारी व विद्यार्थाची सुरक्षा सुनिश्चित करणे यासाठी चडक्र जवान अत्यंत आवश्यक आहेत.

तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तसेच शासन निर्णय नूसार सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये सुरक्षा व्यवस्था सक्षम ठेवणे बंधनकारक आहे.त्या नूसार रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय परिसरात पुरेशा प्रमाणात सुरक्षा कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक आहे.जवानांची संख्याबळ कमी झाल्यास सुरक्षेवर विपरीत होण्याची शक्यता आहे.त्यामुळे महाविद्यालय ,रुग्णालय परिसर व वसतीगृह याची सुरक्षीतता लक्षात घेऊन सुरक्षा रक्षकांची संख्याबळ कमी न करता ती कायम ठेवावी अशा आशयाचे निवेदन दिले आहे.

# दादेगावच्या रामजन्मोत्सवात जंगी कुस्त्यांचा थरार

### माऊली जमदाडे विरुद्ध निशांतकुमार कुस्ती ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू



आष्टी - (प्रतिनिधी) समर्थ शिष्य संत श्री देवदास स्वामी यांच्या समाधीने पावन आणि तब्बल ३७८ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या श्री क्षेत्र दादेगाव येथे रामजन्मोत्सवानिमित्त आयोजित जंगी कुस्त्यांचा हंगाम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. या कुस्ती फडातील प्रमुख आकर्षण ठरलेली पंढरपूरच्या पैलवान माऊली जमदाडे आणि हरियाणाच्या पैलवान निशांतकुमार यांच्यातील दवंडीची कुस्ती प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली. या रोमहर्षक लढतीतील विजेत्यास दीड लाख रुपये रोख पारितोषिक व चांदीची गदा देऊन सन्मानित करण्यात आले.

दादेगाव येथील श्रीराम पंचायतन देवस्थान परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्यापासून श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रमाला उत्साहात सुरुवात झाली. समर्थ रामदास स्वामी यांच्या पदस्पर्शाने आणि देवदास स्वामींच्या समाधीमुळे या ठिकाणाला विशेष ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दिनांक १९ ते २५ मार्च दरम्यान मंदारबुवा रामदासी यांच्या सुश्राव्य व भावस्पर्शी संगीत श्रीराम कथेमुळे परिसर भक्तिमय झाला होता.बुधवार, दि. २५ मार्च रोजी सायंकाळी गावातून कावड, अश्व व छबिना मिरवणूक मोठ्या थाटामाटात काढण्यात आली. गुरुवार, दि. २६ मार्च रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मुगगावकर यांच्या प्रभावी कीर्तनाने रामजन्म सोहळा साजरा करण्यात आला. त्यानंतर सायंकाळी ४ ते रात्री ८ या वेळेत कुस्त्यांचा जंगी फड रंगला. या कुस्ती हंगामात तब्बल ३५ निकाली कुस्त्या रंगल्या. ग्रामस्थ व यात्रा उत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत पंच म्हणून राष्ट्रीय खेळाडू पै. बाळासाहेब शेंदूरकर, जगदाळे व गुंजाळ (अहिल्यानगर) यांनी जबाबदारी पार पाडली. अंतिम आणि मानाच्या कुस्तीसाठी महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांनी प्रमुख पंच म्हणून भूमिका बजावली. या ऐतिहासिक सोहळ्यास आणि कुस्ती हंगामास परिसरातील कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार भीमराव धोंडे, सतीशआबा शिंदे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, राहुल जगदाळे, संजय गाढवे, रामहरी महारनोर, पत्रकार उत्तम बोडखे, विजय पोटे, सदा पाटील दिंडे, रावसाहेब लोखंडे, रावसाहेब सिरसाट, पैलवान अस्लम पठाण, पैलवान हबीबभाई, बाबासाहेब मुळीक, सरपंच भाऊसाहेब कोकरे, उपसरपंच भरत विधाते, सेवा सोसायटीचे चेअरमन सुरेश गर्जे, व्हा. चेअरमन भुजंगराव विधाते, बाबासाहेब पोटे, माजी सरपंच दत्तोबा शिंदे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, अंबादास सुरनर, प्रा. आर. जी. विधाते, सुभाष पाटील निंबाळकर, विष्णू निंबाळकर, पै. दत्ता वाघुले, सतीश शिंदे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विविध क्षेत्रातील पदाधिकारी, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी मंदारबुवा रामदासी यांच्या लळीत कीर्तनाने या भव्य रामजन्मोत्सवाची सांगता झाली असून, या समारोप सोहळ्यास भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच, धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वैभव आणि पारंपरिक कुस्तीचा संगम साधणारा दादेगावचा रामजन्मोत्सव यंदाही उत्साहात आणि दिमाखात साजरा झाला.

# मोलमजुरी करणाऱ्या मजुराच्या लेकीची पोलिस दलात निवड

### वसंत कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पुनम चाळक चा सत्कार



केज/प्रतिनिधी

मोलमजुरी करणाऱ्या मजुराच्या लेकीची पोलिस दलात निवड झाली असून,केज शहरातील वसंत कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पुनम चाळक चा सत्कार करण्यात आला.याबाबत सविस्तर माहिती अशी की,जिद्द,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर शुन्यातून विश्व निर्माण करता येते हे केज तालुक्यातील लव्हरी येथील पुनम वसंत चाळक या मोलमजुरी करणाऱ्या मजुराच्या मुलीने करुन दाखविले, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून पोलिस दलात मजल मारली असून,तिने आई वडीलांच्या कष्टाने स्वप्न साकार केले आहे,पुनम चाळकची यशोगाथा आज ग्रामीण भागातील तरुण तरुणींना प्रेरणेचा स्त्रोत ठरत आहे.पोटाला चिमटा घेऊन दिलेले शिक्षण पुनम चे वडील वसंत चाळक हे मजूर आहेत आर्थीकओढाताण पाचवीला पुजलेली असतानाही आपल्या मुलींने शिकुन स्वतःच्या पायावर उभे रहावे ही त्यांची जिद्द होती. पदोपदी गरीबीचे चटके सोसुन त्यांनी पुनमला शिक्षणासाठी आणि पोलिस भरतीच्या तयारी साठी रक्ताचे पाणी केले.

अथक परिश्रम आणि यश आपल्या कुटुंबाची परिस्थिती बदलण्याच्या इराद्याने पुनमने मैदानात उतरुन सराव सुरू केला. दररोज पहाटे धावणे, गोळा फेक,लांब उडी यांसारख्या शारीरिक चाचण्यांच्या सराव आणि सोबतच अभ्यासाचे सातत्य राखले.तिच्या या चिकाटीमुळे तिची पोलिस दलात निवड झाली आहे.या यशाबद्दल वसंत कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पुनम चाळक चा सत्कार करण्यात आला यावेळी शाळेचे प्राचार्य धेंडे सर, उपप्राचार्य देशमुख सर, प्राचार्य फावडे सर,प्रा. चाळक सर,प्रा.मोगले मॅडम,प्रा समुद्रे सर,प्रा. धपाटे सर.प्रा.साखरे सर, लोंढे सर,रोडे सर,प्रा. घोळवे सर,सोळंके सर, पोटभरे सर,ठोंबरे सर, शेटे सर यांनी पुनम चाळक हिचा शाळेच्या वतीने सत्कार करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# नांदेड येथिल नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे औद्योगिक उद्योग क्षेत्रास भेट

प्रा.सारिका लहानकर यांनी केले भेटीचे व्यवस्थापन

अर्धापूर ।प्रतिनिधी

शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथील वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सह्याद्री फार्म्स पोस्ट हार्वेस्ट केअर लिमिटेड, कृष्णूर एमआयडीसी, नांदेड तसेच गोदावरी पार्टिकल बोर्ड इंडस्ट्रीज़ या नामांकित उद्योगांना शैक्षणिक भेट देऊन उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास केला.

या भेटीचे व्यवस्थापन प्राध्यापक सारिका लहानकर यांनी केले होते व या भेटीत डॉ. ललीता यडपलवार, डॉ. अतिष राठोड, प्रा. सारिका लहानकर, प्रा. किरण वाघमारे, प्रा. माधवी पांडे, डॉ. एन. यू. माचेवाड, प्रा. एम. एम. पांडे, प्रा. रागिनी जयस्वाल यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.भेटीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. फड, उपप्राचार्या डॉ. कल्पना कदम तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. शिवदत्त विभुते यांनी विशेष कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे व्यावसायिक ज्ञान वाढण्यासोबतच त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.एकूणच, या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राची प्रत्यक्ष ओळख झाली असून भविष्यातील करिअर निवडीसाठी हा अनुभव अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

# पंच परिवर्तनाच्या मार्गाने चालत एक महान भारत घडवूया - ॲड.दत्तप्रसाद रांदड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आजच्या बदलत्या जीवनामध्ये व हिंदूंच्या सामाजिक उत्थानासाठी हिंदूंचे ऐक्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हिंदूंनी आपले ऐक्य व सलोखा कायम जोपासून राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी कायम तत्पर असले पाहिजे, तसेच पंच परिवर्तनाच्या मार्गाने चालत एक महान भारत घडवूया असे विचार ॲड.दत्तप्रसाद रांदड यांनी व्यक्त केले. रामनवमी निमित्त जागृती हनुमान मंदिर एल.आय.सी.कॉलनी, नागझरी परिसर, अंबाजोगाई येथे सकल हिंदू समाजाच्या पुढाकाराने हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते, या प्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्हणून मधुकर आजले (नायब तहसीलदार, अंबाजोगाई) तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय कुलकर्णी (आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रमुख मार्गदर्शक) आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड.दत्तप्रसाद रांदड म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने या संघटनेचे कार्य व महत्त्व प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचावे या उद्देशाने हिंदू संमेलन प्रत्येक गावामध्ये वस्त्यांमध्ये नगरांमध्ये आयोजित करण्याचा संकल्प केलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे आजचे हे हिंदू संमेलन सकल हिंदू समाजाच्या पुढाकाराने आयोजित केले आहे हे अभिनंदनीय आहे. उपस्थित सर्व रामभक्त बांधव आणि भगिनींनो आज आपण येथे केवळ रामनवमी साजरी करण्यासाठीच जमलो नाही. तर आपण जमलो आहोत रामाच्या आदर्शांना आपल्या जीवनात उतरविण्यासाठी. श्रीराम कोण आहेत ? श्रीराम म्हणजे आदर्श आहे. श्रीराम म्हणजे मर्यादा आहे. श्रीराम म्हणजे कर्तव्य आहे आणि म्हणूनच रामराज्य ही केवळ कल्पना नाही. तर ती आपली जबाबदारी आहे. आजचे वास्तव पहाता समाजात काय दिसतेय ? आज विखुरलेला समाज, कमी होत चाललेले संस्कार, वाढत चाललेला स्वार्थ आणि कमी होत चाललेली एकता. म्हणूनच हिंदू संमेलन ही आजची सर्वांत मोठी सामाजिक गरज आहे. मित्रांनो, गेल्या १०० वर्षांपासून एक विचार शांतपणे काम करीत आहे. तो विचार व्यक्ती घडवतो. समाज जोडतो. राष्ट्रभक्ती निर्माण करतो. संघाची स्थापना १९२५ मध्ये पूजनीय डॉ.हेडगेवार यांनी असंघटित हिंदू समाजाला हिंदुत्वाच्या आधारावर संघटित करण्याच्या विचाराने केली. याची १०० वर्षांपासूनची अविरत साधना आहे. आज आपण या शताब्दी वर्षांत उभे आहोत. शताब्दी वर्ष हा केवळ उत्सव नाही. तर हा संकल्पाचा क्षण आहे. पंच परिवर्तन- समाज परिवर्तनाच्या जन जागरण व बदलासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी संघाने आपल्याला एक दिशा दिली आहे. त्यानुसार पंच परिवर्तन म्हणजे स्व-




परिवर्तन म्हणजे स्वतः बदला. शिस्त, प्रामाणिकपणा, राष्ट्रभक्ती अंगीकारा. कुटुंब प्रबोधन म्हणजे घरात संस्कार द्या. मोबाईल नाही. संवाद वाढवा. सामाजिक समरसता म्हणजे जात-पात विसरा. आपण सर्व हिंदू आहोत ही भावना जपा. पर्यावरण संरक्षण म्हणजे वृक्ष लावा, निसर्ग वाचवा. आणि स्वदेशी आणि समाज कर्तव्य म्हणजे स्वदेशी वापरा, समाजासाठी जगा याकरिता मित्रांनो, हिंदू संमेलन ही सकल हिंदू समाजाने हिंदूंच्या एकत्रीकरणाच्या परिवर्तनाची केलेली सुरूवात आहे. आज आपण रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर बीज पेरतो आहोत. उद्या त्याचा वटवृक्ष तयार करायचा आहे. पण, तो आपोआप होणार नाही. त्यासाठी सातत्य हवे. त्यासाठी कृती हवी. त्यासाठी समर्पण हवे. यासाठी हवी ठोस कृती. आज इथून जाताना आपण ठरवूया साप्ताहिक सामूहिक आरती, दर आठवड्याला एकत्र या, रामनवमी, हनुमान जयंती, शिवजयंती, सण-उत्सव सामूहिक साजरे करा. समाजसेवा, रक्तदान, स्वच्छता, गरजूंना मदत करा. हिंदू संमेलनाच्या माध्यमातून मी युवकांना आवाहन करतो की, युवकांनो आता वेळ आली आहे. मोबाईल सोडा, मैदानात या, समाजात उतरा, नेतृत्व घ्या. युवक जागा झाला, तर रामराज्य थांबवणारा कोणी नाही. हिंदू एकता हीच अंतिम शक्ती आहे. आपण विभागलो तर आपण कमजोर होवूत. जर आपण एकत्र आलो तर आपण अजेय ठरू, तेव्हा जात नाही. पंथ नाही. भाषा नाही. आपण फक्त हिंदू आहोत. असे सांगून यावेळी मी बदलणार, मी समाजासाठी काम करणार, मी हिंदू एकतेसाठी उभा राहणार, मी रामराज्य निर्माण करण्यासाठी कार्य करणार असा अंतिम संकल्प करण्यात आला. व रामराज्य कुठून येणार नाही. तर ते आपणच घडवणार आहोत. चला तर मग रामाच्या आदर्शाने जगूया, हनुमानाच्या शक्तीने काम करूया, आणि संघाच्या विचारांनी प्रेरित होऊन पंच परिवर्तनाच्या मार्गाने चालत एक महान भारत घडवूया असे आवाहन ॲड.दत्तप्रसाद रांदड यांनी केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना संजय कुलकर्णी म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या युगामध्ये मानसिक शांतता राखण्यासाठी आपण ध्यान धारणा केली पाहिजे. मन स्थीर व शांत असेल तरच खऱ्या अर्थाने आपण सुखी व समाधानी राहू त्यासाठी सुदर्शन क्रिया महत्त्वाची आहे. आरोग्य चांगले असेल तरच खऱ्या अर्थाने आपण हिंदू म्हणून एक संघ राहू शकू असे कुलकर्णी म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी मधुकर आजले यांनी हिंदू संमेलनाचे महत्त्व अत्यंत मौलिक शब्दांमध्ये व्यक्त केले.



# पवन सुर्यकांत चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड

बीड/प्रतिनिधी

दि.२६ मार्च २०२६ रोजी पोहरादेवी येथे भक्तीधाम धर्मपीठ गोर बंजारा साहित्य परिषद निमित्त राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी पवन सुर्यकांत चव्हाण यांची नुकतीच सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडी मुळे समाजबांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि वरिष्ठ पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड जाहीर करण्यात आली.पवन चव्हाण हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून बंजारा समाजाच्या शैक्षणिक,आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संघटनेने त्यांच्यावर जिल्हा नेतृत्वाची जबाबदारी सोपवली आहे.या निवडीनंतर बोलताना पवन चव्हाण म्हणाले की,संघटनेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे,त्या विश्वासाला पात्र ठरून मी जिल्ह्यातील तांड्या- वस्त्यांवरील प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहीन.समाजातील युवकांना मुख्य प्रवाहात आणणे आणि शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हे माझे मुख्य ध्येय असेल.

जिल्हा अध्यक्ष नियुक्तीपत्र किसन भाऊ राठोड संघटनसमन्वयक, रामेश्वर नाईक मुख्यमंत्री आरोग्य दुत,ड.पंडित राठोड राष्ट्रीय कार्याध्यक्ष,डॉ.मोहन चव्हाण,धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज,गोर नायक उमेश राठोड महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, सत्यम पवार,प्रदेश प्रवक्ते,डॉ.तुषार राठोड संघटक बाजीराव महाराज,श्रीमंत राजे युवा प्रदेश अध्यक्ष मिथुन राठोड प्रवक्ते,संतोष राठोड इतर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.सर्व राष्ट्रीय बंजारा परिषदचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# जातीपातीच्या पलीकडे जाऊन महात्मा फुले जयंती साजरी करा; सर्वधर्मीयांनी सहभागी व्हावे-सुरज शिंदे यांचे आवाहन

आष्टी - (प्रतिनिधी)

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आष्टी शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या उत्सवात सर्व समाजबांधवांनी जाती-धर्माचे भेद विसरून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सुरज किसन शिंदे यांनी केले आहे.

येत्या ११ एप्रिल २०२६ रोजी आष्टी शहरात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना सुरज शिंदे म्हणाले की, महात्मा फुले यांनी बहुजन समाज, शेतकरी, मजूर आणि स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून समाज परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांचे कार्य कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. मात्र आज काही ठिकाणी महापुरुषांना जातीच्या चौकटीत



बंदिस्त करण्याचा प्रयत्न होत आहे, ही चिंताजनक बाब असून ही मानसिकता बदलणे काळाची गरज आहे. विद्येविना मती गेली... हा जीवनमंत्र देणारे महात्मा फुले हे आधुनिक भारताचे खरे शिल्पकार होते. त्यांनी आयुष्यभर शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी कार्य केले. त्यामुळे त्यांची जयंती साजरी करणे हे केवळ एका समाजाचे कर्तव्य नसून, शिक्षण, समानता आणि न्याय यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे, असेही त्यांनी नमूद केले.

जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आष्टी शहरातील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक येथे फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे. सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, यात विविध राज्यांतील पारंपारिक वाद्य पथकांचा सहभाग असणार आहे.

तसेच १० एप्रिल रोजी सकाळी श्री संत सावता मंदिर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच युवकांसाठी वक्तृत्व स्पर्धा व इतर वैचारिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

आष्टी शहर व परिसरातील सर्व समाजबांधव, युवक, माता-भगिनी यांनी कोणताही भेदभाव न ठेवता या जयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी एकत्र यावे, असे कळकळीचे आवाहन सुरज किसन शिंदे यांनी केले आहे.

महापुरुषांना जातीच्या चौकटीत बांधू नका. क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले हे संपूर्ण विश्वाचे वंदनीय आहेत. चला, जातीपातीच्या पलीकडे जाऊन त्यांच्या विचारांना आत्मसात करूया, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला.

# कोंडलेल्या नद्या घेतायेत मोकळा श्वास

## मयंक गांधीच्या जलक्रांतीचा महायज्ञ

परळी / अनुप कुसुमकर (भावसार)

नदी केवळ पाणी वाहून नेणारा प्रवाह नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे, हे ओळखून दुष्काळाच्या छायेतून मुक्त होऊन शाश्वत पाणी साठवणुकीकडे वाटचाल करण्यासाठी परळी, अंबाजोगाई आणि धारूर तालुक्यात सध्या जलसंधारणाचे अभूतपूर्व काम सुरू आहे. या तालुक्यातुन वाहणाऱ्या पापनाशी, गुणवारा, वान आणि सरस्वती या नद्यांसह त्यांच्या उपनद्यांचे खोलीकरण, रुंदीकरण आणि पाणी पुनर्भरण या वैज्ञानिक ( ऋठ- ) तंत्रज्ञानाचा वापर करून भूगर्भातील पाणीपातळी वाढवण्याचा निर्धार जलपुरुष मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्लोबल विकास ट्रस्ट मार्फत राबविण्यात येत असून याचे काम वेगाने सुरू आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा विशेषतः बीड जिल्हा हा सातत्याने दुष्काळाच्या सावटा मध्ये येतोय. कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टी आणि त्यामध्ये अवकाळी व बिगर मोसमी पाऊस यामुळे जिल्ह्यातील कृषी क्षेत्र पुर्णतः उद्धवस्त झाले आहे. कृषी, उद्योग आणि पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भूगर्भातील पाण्याचा उपसा होत असल्याने जिल्ह्यातील पाणी पातळीत कमालीची घट झाली आहे.सातत्याने दुष्काळाच्या दुष्टचरकात अडकलेल्या बीड जिल्ह्यातील खरीप आणि रब्बी हंगामावर विपरीत परिणाम तर होतोच याच सोबत




जनावरांच्या चार्याचा प्रश्न, पिण्यायोग्य पाण्याचा प्रश्न, उद्योगधंदे हा प्रश्न ही बिकट बनला आहे. निसर्गाच्या या अवकृपेने जिल्ह्यातील बळीराजा पूर्णपणे उध्वस्त होऊन आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल घेत आहे. देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या नोंद ही बीड जिल्हयात झालेली असून

या सर्व विदारक परिस्थितीत जिल्ह्याचा आणि शेतकऱ्यांच्या जीवनात सुबकता आणण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी केला.मयंक गांधी यांच्या दूरदृष्टीतुन ग्लोबल विकास ट्रस्ट हे मागील काही वर्षापासून परळी, अंबाजोगाई, धारूर सह इतर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती आणण्याचे काम करत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचे विवाह सोहळ्याचे आयोजन करणे, अतिवृष्टीग्रस्त भागातील अनेक गावातील ६ हजारापेक्षा अधिक बाधित कुटूंबियांना जीवनावश्यक साहित्य आणि रेशन पुरवठा करून त्यांना मदत करणे, अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान याची शास्त्रशुद्ध माहिती व प्रशिक्षण देणे यासह अनेक कामे ट्रस्ट मार्फत करण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर शाश्वत शेती हे एकमेव साधन असल्याचे ओळखून शेतीला कायमस्वरूपी सिंचनाची सोय व्हावी, पडलेल्या पावसाचा थेंब न थेंब वाया न जाता त्याचे सर्वधन व्हावे यासाठी परळी, अंबाजोगाई, धारूर तालुक्यातील प्रमुख जलवाहिनी असलेल्या वाण, पापणाशी, गुणवरा आणि सरस्वती या नद्या, त्यांच्या उपनद्या आणि तालुक्यात वाहणारी मोठी ओढी त्यामधून लाखो लिटर पावसाचे पाणी वाहून जाते. नद्यांमध्ये झालेल्या अतिक्रमण अडथळ्यामुळे नदी मधून वाहून जाणारे पाणी पात्राबाहेर येऊन नदी शेजारील शेतीचे होणारे मोठे नुकसान याचा अभ्यास करून मान्सुमपूर्व काळात या शास्त्रशुद्ध पद्धतीने नद्यांचे पुनर्जीवन आणि खोलीकरण काम ट्रस्ट मार्फत वेगाने सुरू आहे. केवळ पाणी अडवून चालणार नाही, तर ते जमिनीत मुरवणे आवश्यक आहे, हे ओळखून या प्रकल्पात अधिकाधिक ऋठ- उभारले जात आहेत. या वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापराने नदी क्षेत्रातील असंख्य गावातील पाणी पातळीत लक्षणीय वाढ होणार आहे. या सर्व कामामुळे शाश्वत सिंचनाची सोय होऊन या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडणार आहे.

# अनंत क्लबचे भव्य उद्घाटन व प्रेरणादायी व्याख्यान सोहळा उत्साहात संपन्न




नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या अनंत क्लबचे भव्य उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, तसेच त्यांच्या बौद्धिक, सर्जनशील व सामाजिक क्षमतांचा विकास घडविणे हा या क्लब स्थापनेमागील प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून दूर शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहलानी उपस्थित होते, तर प्र-कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेसच्या संचालिका डॉ. रुपाली जैन यांनी सन्माननीय उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. रुपाली जैन यांनी अनंत क्लबची संकल्पना व उद्दिष्टे प्रभावीपणे मांडली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सहशैक्षणिक उपक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी गणित व सांख्यिकी विषयांचे डेटा सायन्स व क्वांटम कॉम्प्युटिंग यांसारख्या आधुनिक क्षेत्रांतील वाढते महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत आधुनिक कौशल्ये आत्मसात करून स्टार्टअप्स व उद्योजकतेच्या माध्यमातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी अनंत क्लबच्या संघटनात्मक रचनेची घोषणा करण्यात आली. फॅकल्टी कोऑर्डिनेटर म्हणून डॉ. अनिकेत मुळे, स्टुडंट प्रेसिडेंट म्हणून अनिकेत अवचार, सेक्रेटरी म्हणून निकिता गाडेकर, जॉइंट सेक्रेटरी म्हणून तनिषा पिसारीवार, तर ट्रेझरर म्हणून सचिन साळवे यांची निवड करण्यात आली. तसेच इव्हेंट कोऑर्डिनेटर्स म्हणून पूजा खानसोळे, सुधाकर जाधव, ऐश्वर्या कोकाटे आणि श्वेता नरगोडे यांच्यावर जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

उद्घाटन सोहळ्यानंतर अनंत क्लबच्या पहिल्या उपक्रमांतर्गत - ढीरपीर्षेीारींळेपरश्र चेींळींरींळेपरश्र ढरश्रज्ञ या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. प्रकाश निहलानी यांनी खसपळींळपस र्धेीपस चळपवी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सकारात्मक विचारसरणी, ध्येय निर्धारण, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

या कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी प्रकोष्ठाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांच्यासह डॉ. अनिकेत मुळे, डॉ. नितीन दारकुंडे, डॉ. उषा सांगळे व उदय दिव्यवीर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वेदिका सोनुने यांनी सुरेखरीत्या केले, तर आभार प्रदर्शन हिमांशू आकराते यांनी व्यक्त केले.उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला. भविष्यात अनंत क्लब विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावीपणे कार्यरत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राजीव गांधी महाविद्यालयात अतिथी व्याख्यान संपन्न




मुदखेड ।प्रतिनिधी

मुदखेड राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभागातर्फे 'साहित्यिक संवेदना और समाज' या विषयावरती अतिथी व्याख्यान संपन्न झाले. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख विजय सिंग ठाकूर, प्रमुख अतिथी डॉ. भीमराव घोडगे व विशेष अतिथी डॉ. जाधव सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सुप्रिया निखाते हिच्या स्वरचित स्वागत गीताने झाली. याप्रसंगी अतिथी व्याख्याते म्हणून पीपल्स कॉलेज नांदेड येथील प्राध्यापक डॉ. भीमराव घोडगे यांनी 'साहित्यिक संवेदना तथा समाज' या विषयावरती विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात प्राचीन साहित्यातील रामायण, महाभारत यापासून ते मध्ययुगीन काळातील बिहारी, तुलसी, मीराबाई व आधुनिक काळातील निराला, प्रसाद, मृदुला गर्ग या व अशा अनेक साहित्यिक व साहित्यकृतींचा वेध घेतांना ते समाजासाठी अत्यंत अनमोल, दिशादर्शक व प्रेरणादायक आहे असे प्रतिपादन केले. ते पुढे म्हणाले की साठोत्तरी साहित्यातून दलित, स्त्री, शेतकरी, आदिवासी व किन्नर अशा विविध अस्मिता सामाजिक संवेदना जागवण्यास महत्वपूर्ण ठरल्या. आपल्या भाषेचं, संस्कृतीचं, श्रमाचं व मातीचं सौंदर्य ज्या साहित्यात उतरतं तेव्हा सामाजिक संवेदनशीलता वाढून प्रगतीकडे वाटचाल होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख विजय सिंह ठाकुर होते त्यांनी आपले विचार व्यक्त करताना असे प्रतिपादन केले की एकीकडे आज समाजातील चंगळवाद वाढताना दुसरीकडे साहित्यातून श्रद्धा,आशा, विश्वास, प्रेरणा ह्या समाजाला माणुसकी शिकवतात.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे प्रा.डॉ. लक्ष्मण कदम यांनी केले तर आभार डॉ.बालाजी जाधव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ. राहुल धावारे डॉ. बालाजी जाधव, प्रा. सुलोचना माळवे, प्रा.नागेश कुराडे, प्रा.संतोष बिरादार इत्यादी प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी यशस्वीतेसाठी हिंदी विभाग प्रमुख डॉ.विजयसिंह ठाकूर, डॉ.लक्ष्मण कदम व डॉ. शेख बुशरा यांनी परिश्रम घेतले.

# 'स्वारातीम' विद्यापीठात अद्यावत आण्विक जीवशास्त्र कार्यशाळेचा समारोप

## नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून कौशल्य मिळवा - कुलसचिव डॉ. डी. डी. पवार



नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान व हाय मीडिया लॅब्रॉडरीज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जैविकशास्त्र संकुलात आयोजित करण्यात आलेल्या 'अद्यावत आण्विक जीवशास्त्र' या विषयावरील सात दिवसीय कार्यशाळेचा समारोप आज कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्यामध्ये प्राविण्य मिळवणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून ते शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात सक्षमपणे टिकून राहू शकतील.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विषयाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक ज्ञान न घेता प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विविध अत्याधुनिक तंत्रांचा अनुभव घेतला. यात डीएनए शुद्धीकरण, प्लास्मिड डीएनए वेगळा करणे, आण्विक आकार निर्धारण, निर्बंध खंड लांबी बहुरूपता (ठऋङझ), सदर्न ब्लॉटिंग, एस.डी.एस. पेज, आयन विनिमय वर्णलेखन (खेप एलहरपसश उहीीरींसीरहि) यांसारख्या तंत्रज्ञानांची सविस्तर माहिती व प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमास संकुल संचालक डॉ. बी. एस. सुरवसे, सहसंयोजक डॉ. टी. ए. कदम, डॉ. ए. पी. पाठक, डॉ. एस. पी. चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन समरीन पठाण यांनी केले.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. हेमलता भोसले, आयोजन सचिव डॉ. उमेश धुलधज, प्रतिभा ढवळे, डॉ. सुनील हजारे तसेच डॉ. मिलिंद गायकवाड, सौ. विद्या सुकरे, गोविंद सूर्यवंशी, सौ. वसुधा कोडगिरे, खाजा मोईनुद्दीन, शेरे, खरवडकर, हस्सेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



# तामसात एचपी पेट्रोलपम्प बंदच ..

तामसा (प्रतिनिधी ) युद्धजन्य परिस्थितीमुळे संपूर्ण देशात गॅस पेट्रोल ची कृत्रिम टंचाई भासत असल्या चे दृश्य तामसात पाहायला मिळत आहे. तामशात एचपी चा पेट्रोल पंप खूप दिवसापासून बंद असल्यामुळे खाजगी पेट्रोलिंग नायरा पेट्रोल पंपावर तोबा गर्दी होत आहे. तामसा येथे एचपी पेट्रोलियम विगत काही दिवसापासून बंद आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार पेट्रोल पंप बंद ठेवण्याचा कारण दर्शनीय भागात अथवा शासनाच्या पुरवठा विभागात याची माहिती देणं बंधक कारक असून शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविली जात आहे. आजच्या या युगात पेट्रोल डिझेल गॅस मूलभूत आवश्यक असून शासनाने या सर्व गोष्टींवर वॉच ठेवण्यासाठी पुरवठा विभागाकडे नोंद नसल्याचे कारण पुढे येत आहे. शेतकऱ्यांचा हळद काढणे गहू काढणे हरभरा काढणे या सर्व गोष्टीसाठी ट्रॅक्टर, हॉलर साठी डिजल आवश्यक असून कृत्रिम त्यांच्यामुळे शेतकऱ्यांची हेळसांड होत आहे. शासनाने डब्यात बॉटल कॅन कॅन मध्ये डिझेल देण्याची सक्त आदेशामुळे शेतात डिझेल मूळ बंद पडलेल्या हॉरिस्टर, हालर पंपापर्यंत आणण्यासाठी मोठी कसरत करावा लागत आहे. तामसा येथील एचपी पेट्रोल पंप बंद असल्याचा कारण विचारण्यासाठी संपर्क केल्या असताना क्रेडिट आणि फायनान्स कारण दाखवण्यात आला..शेतकऱ्यांना केन मध्ये डिजल पुरवठा करा अशी मागणी भाजप महिला तालुका अध्यक्ष ममता जोशी यांनी केली..



## बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियाना'अंतर्गत मुदखेड बस स्थानकाची विशेष पथकाकडून पाहणी

मुदखेड ।प्रतिनिधी

स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२६ अंतर्गत, आज दि. २६ मार्च रोजी मुदखेड बस स्थानकाची विशेष तपासणी पथकाद्वारे करण्यात आली. या मोहिमेमुळे बस स्थानक परिसरातील स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विशेष भर देण्यात येत आहे.

या मोहिमेसाठी धाराशिव विभागाचे अजय पाटील विभाग नियंत्रक, प्रदीप सुतार कामगार अधिकारी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पथकाने स्थानकाला भेट दिली.

यावेळी मुदखेड बस स्थानकाच्या वतीने आणि स्थानिक मान्यवरांच्या वाहतूक नियंत्रक निर्दोष पवार यांनी पथकाचे उत्साहात स्वागत करण्यात आले.याप्रसंगी नांदेड बसस्थानक प्रमुख यासिन खान , ईश्वर पिन्नलवार सहसचिव, मराठी पत्रकार संघ, नांदेड जिल्हा, संजय गळगे, निर्दोष पवार वाहतूक नियंत्रक मुदखेड यांच्यासह अदी उपस्थित होते

तपासणी दरम्यान पथकाने बस स्थानकाचा परिसर, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृहे आणि प्रवासी बाकड्यांची बारकाईने पाहणी केली. केवळ कागदावर स्वच्छता न ठेवता ती प्रत्यक्षात दिसावी, यासाठी प्रशासकीय पातळीवरून सूचना देण्यात आल्या. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि आरोग्यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांची गांधीनगर (गुजरात) येथील युजीसी इंफ्लीबनेट केंद्रास भेट

नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांनी गांधीनगर (गुजरात) येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे अंतर विद्यापीठ असलेल्या इंफ्लीबनेट केंद्रास भेट दिली. इंफ्लीबनेट केंद्राचे प्र. संचालक मनोज कुमार के. यांनी इंफ्लीबनेट केंद्राचे सन्मानचिन्ह देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी इंफ्लीबनेट केंद्राच्या विविध विभागांना भेटी देऊन केंद्राचे उपक्रम व सेवांची माहिती करून घेतली. इंफ्लीबनेट हे भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्वाचे केंद्र असून भारतातील सर्व पीएच. डी. प्रबंधाचे डीजीटलायझेशन करून सर्व प्रबंध सर्वांना मुक्त उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वन नेशन, वन सबस्क्रीप्शन अंतर्गत केंद्र शासनाच्या सहा हजार कोटी रुपयाच्या निधीतून तेरा हजाराहून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स व डाटाबेस भारतीय उच्च शिक्षण संस्थाना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा इंफ्लीबनेटच्या उपक्रमात सक्रीय सहभाग असून हे विद्यापीठ शोधगंगोत्री या मध्ये भारतात पहिला तर शोधगंगा मध्ये महाराष्ट्रात तिस-या व भारतात पहिल्या वीस विद्यापीठात आहे. वन नेशन, वन सबस्क्रीप्शन, वांग्मयचौर्य तपासणी, विद्वान प्रोफाईल, इंडकॅट, इंडियन रिसर्च इॅन्फोरमेशन मॅनेजमेंट सिस्टम, सोल, शेरनी, लिब वाहिनी इत्यादी डीजीटल उपक्रमात ही हे विद्यापीठ सक्रीय आहे. विद्यापीठाच्या या सक्रीय सहभागाबद्दल इंफ्लीबनेट केंद्राचे प्र. संचालक मनोज के. आनंद व्यक्त करून विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ मनोहर चासकर यांचे अभिनंदन करून प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांचा प्रतिनिधिक सत्कार केला. यावेळी शास्त्रज्ञ हितेशकुमार सोळंकी, शास्त्रज्ञ पल्लभ प्रधान, शास्त्रज्ञ होशामनी यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी इंफ्लीबनेट केंद्राकडून प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांच्या झालेल्या या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त केला.

# मुदखेडमध्ये पचलींग हॉस्पिटल मध्ये मोफत हृदयरोग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## मुदखेड चे भुमिपुत्र डॉ श्रीकांत भोसकर यांनी केले



मुदखेड ।प्रतिनिधी

येथील पचलींग हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत हृदयरोग निदान शिबिरास मुदखेड शहर व तालुक्यातून शेकडो रुग्णांनी हजेरी लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत भोस्कर यांनी या शिबिरात रुग्णांची सखोल तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले.

मूळचे मुदखेडचेच सुपुत्र असलेले ग्लोबल हॉस्पिटलचे डॉ. श्रीकांत भोस्कर यांनी आपल्या जन्मभूमीप्रती असलेले सामाजिक ऋण मानून या भव्य शिबिराचे आयोजन केले होते. समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून मुदखेडमधील नागरिकांसाठी हे मोफत शिबिर आयोजित केले असे डॉ. भोस्कर यांनी यावेळी नमूद केले.

अनेक चाचण्यांचे मोफत आयोजन करत

डॉ. संदीप पचलींग यांच्या पुढाकाराने झालेल्या या शिबिरात प्रामुख्याने खालील लक्षणे असलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आले या मध्ये

छातीत दुखणे किंवा जड वाटणे.दम लागणे, चक्कर येणे किंवा सतत घाम येणे.मळमळ, उलट्या आणि अस्वस्थता वाटणे.यासोबतच शुगर (मधुमेह) आणि बीपी (रक्तदाब) यांसारख्या महत्त्वाच्या चाचण्याही मोफत करण्यात आल्या.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. संदीप पचलींग आणि डॉ. रेणुका पचलींग यांनी विशेष परिश्रम घेत त्यांच्यासह हॉस्पिटलमधील कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्य तपासणीसोबतच रुग्णांना हृदयविकारापासून बचावासाठी जीवनशैलीत काय बदल करावेत, याचेही मार्गदर्शन डॉक्टरांनी केले.या शिबीरात जवळपास दोनशे गोर गरीब रुग्णांना एसीजी व शुगर तपासणी केली असुन या रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## बेपत्ता मुलींचा उत्तम रित्या तपास केला केजच्या पथकाचा एसपीकडून सन्मान

केज ।प्रतिनिधी

केज पोलिस उप विभागा तुन बेपत्ता झालेल्या विविध तक्रारीतील बेपत्ता मुलींचा शोध घेऊन त्यांचा उत्तमरित्या तपास केल्याबद्दल केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक व महिला पोलीस अशा कर्मचाऱ्यांचा जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी प्रशस्तीपत्र देऊन सोमवार दि.२३ मार्च रोजी त्यांचा सन्मान केला.केज पोलिस उपविभागात येत असलेल्या केज,धारूर, युसुफवडगाव व नेकनुर या चार पोलिस ठाण्यात या महिन्यात तब्बल २० महिला व मुली बेपत्ता असल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्या बेपत्ता प्रकरणातील वीस मुलींचा तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक सुकुमार बनसोडे व महिला पोलीस नाईक नीता सुर्वे यांनी करून त्यांचा शोध घेऊन बेपत्ता महिला आणि मुलींना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले होते.या त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सोमवार दि.२३ मार्च रोजी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे,पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे,महिला पोलीस नाईक नीता सुर्वे यांचा प्रशस्ती पत्र देऊन त्यांचा सन्मान केला आहे. यावेळी अंबाजोगाईच्या अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके,बीडचे अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर,केजचे सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे उपस्थित होते.



## केज तहसीलदार राकेश गिड्डे यांचा 'उत्कृष्ट प्रशासकीय सेवा गौरव' पुरस्काराने सन्मान

केज/प्रतिनिधी

केज तहसील कार्यालया चे कर्तव्यदक्ष व जनतेशी सुसंवाद साधणारे अधिकारी तहसीलदार राकेश जी गिड्डे यांचा त्यांच्या उल्लेखनीय प्रशासकीय कार्याची दखल घेत भव्य सन्मान करण्यात आला.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, तसेच राष्ट्रीय पत्रकार संघ केज यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना 'उत्कृष्ट प्रशासकीय सेवा गौरव पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

तहसीलदार गिड्डे यांनी आपल्या कार्यकाळात पारदर्शक,जलद आणि लोकाभिमुखप्रशासनाची अंमलबजावणी करत सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.महसूल विभागा तील विविध कामांमध्ये त्यांनी दाखवलेली तत्परता,निर्णयक्षमता आणि जनहिताची भूमिका यामुळे त्यांचे कार्य विशेष ठरले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पत्रकार संघटनांकडून हा सन्मान देण्यात आला.या सन्मान सोहळ्याच्या वेळी पत्रकार हनुमंत भोसले, रामदास तपसे,गौतम बचुटे,संतोष गालफाडे, महादेव गायकवाड, पांडुरंग कसबे,चंद्रकांत पाटील तसेच संपादक अजय भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.उपस्थित मान्यवरांनी गिड्डे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

सन्मान स्वीकारताना तहसीलदार गिड्डे यांनी हा पुरस्कार आपल्या संपूर्ण प्रशासनिक टीमचा असल्याचे नमूद करत, पुढील काळातही नागरिकाभिमुख सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला.केज तालुक्यासाठी अभिमानास्पद क्षण ठरलेला हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.




## अंबाजोगाईत ३१ मार्च रोजी रिपाइं (ए) कार्यकर्ता मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहा - तालुकाध्यक्ष प्रमोद दासूद

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बहुजन समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व गायरान धारकांचे अंबाजोगाई तालुक्यातील सर्व लोकांचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी, गायरान धारकांसह समाजातील विविध प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी रिपाइं (ए) युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार, दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी राघव फंक्शन हॉल, बस डेपो समोर, अंबाजोगाई येथे दुपारी साडेबारा वाजता भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तरी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष प्रमोद दासूद यांनी केले आहे.

या मेळाव्यास राजू जोगदंड, सचिनभाऊ कागदे, दीपक कांबळे (केज तालुकाध्यक्ष), दीपक कांबळे (अंबाजोगाई), राणीताई गायकवाड, दशरथ सोनवणे, राहुल गंडले, मधुकर कसबे, कोमल मस्के, करण साळवे, उमेश बचाटे, भाऊ कोरडे, राहुल जोगदंड, भाऊराव होके आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात अंबाजोगाई तालुक्यातील गायरान धारकांना सरसकट सातबारा देण्यात यावा, गायरान जमिनीची नोंद वर्ग एक मध्ये घ्यावी, गायरान, गावठाण वस्ती मधील घरकुल धारकांना मालकी हक्काचा पीटीआर देण्यात यावा, प्रलंबित घरकुल मिळणेसंबंधी जलद कार्यवाही व्हावी, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करून ती वेळेवर देण्यात यावी, यासह विविध मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं (ए) प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे हे कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या उपस्थितीत अंबाजोगाई शहरात आयोजित रिपाइं कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यात मौलिक मार्गदर्शन करणार आहेत. तरी अंबाजोगाई तालुक्यातील रिपाइं (ए) चे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, गायरान धारक, घरकुल धारक, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं (ए) चे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष प्रमोद दासूद यांनी केले आहे.



प्रमोद दासूद
तालुकाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)